


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २५४ ■ मंगळवार, दि. २४ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## साताऱ्यात लोकशाहीची हत्या- खा. सुळे

**सातारा :** साताऱ्यातील हे सगळं प्रकरण एका सशक्त लोकशाहीसाठी हानिकारक आहे. याच्या विरोधात लढाई झालीच पाहिजे. हा देश कोणाच्या मनमर्जीने चालणार नाही. हा देश फक्त संविधानाने चालणार. याच्यात पोलिसांचा संबंध नाही. त्या ठिकाणी असलेल्या पोलिसांमागे जी अदृश्य शक्ती होती की त्याची ताकद आहे. अदृश्य शक्तीने हे पोलिसांना करायला सांगितलं. नाहीतर महाराष्ट्रातील पोलीस असे कधी स्वतःहून करणार नाहीत. मी मुख्यमंत्र्यांना या संदर्भात पत्र लिहिणार आहे. साताऱ्यात जे काही झालं ती लोकशाहीची हत्या आहे, असे मत सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले.

# पंधरा दिवसात पंचनामे करणार - कृषी मंत्री

प्रतिनिधी २४ मार्च

**मुंबई:** विधिमंडळ कामकाजात आज विधानपरिषदेचे सदस्य उद्धव ठाकरे यांच्यासह ९ सदस्यांचा निरोप समारंभ पार पडणार आहे. तसेच उद्धव ठाकरे यांच्याविषयी निरोप समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून काय बोलले जाते याकडे लक्ष असणार आहे. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी गेल्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे जे नुकसान झाले आहे त्यावर भाष्य केले आहे. ते म्हणाले, राज्यात गेल्या पंधरा दिवसांत अवकाळी पावसामुळे तसेच गारपिटीमुळे पिके आणि फळबागांचं नुकसान झालं आहे त्यांचे पंचनामे सुरू आहेत, त्याचा आढावा घेऊन नुकसान भरपाई देण्यात येईल.



आज महाराष्ट्र विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील स्थगन प्रस्ताव सूचनेद्वारे युवासेनाप्रमुख शिवसेना नेते आमदार आदित्य ठाकरे ह्यांनी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वानरांवर करण्यात आलेल्या हल्ल्याबाबत मुद्दा मांडला व त्वरीत चौकशी करण्याचे आदेश देण्याची मागणी केली. यावेळी बोलताना आदित्य ठाकरे यांनी अप्रत्यक्षपणे शिंदे गटावर निशाणा साधला आहे.

हाफकिनकडे असलेला लस तयार करण्याचा स्टेन ही अत्यंत दुर्मिळ आणि ऐतिहासिक जैव-संपत्ती आहे. याचे बाजारमूल्य शेकडो कोटी रुपये आहे. यावर काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून आक्षेप घेतला.हाफकिन ही संस्था स्वतः लस उत्पादनात सक्षम असताना, १५०० कोटींचा हा मौल्यवान ठेवा खाजगी कंपनीच्या हातात का दिला जात आहे, असा सवाल विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.हाफकिन ही संस्था आजपर्यंत स्वस्तात लस निर्माण करते. जर खासगी कंपनीच्या हातात गोष्टी गेल्यास सामान्य नागरिकांना लस महाग दरात मिळण्याची शक्यता. यामुळे सार्वजनिक आरोग्य व्यवस्था कमकुवत होईल.राज्याच्या मौल्यवान जैव-संपत्तीवर खाजगी कंपनीचे नियंत्रण हा धोका आहे अस वडेट्टीवार विधानसभेत म्हणाले.त्यामुळे खाजगी कंपनीला स्टेन देण्याची प्रक्रिया तात्काळ स्थगित करावी. हाफकिनला स्वतःचे उत्पादन वाढवण्यासाठी प्रोत्साहन आणि प्राधान्य द्यावे अशी भूमिका वडेट्टीवार यांनी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून मांडली.

राज्यात सध्या कायदा-सुव्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाला असून, अल्पवयीन मुलींच्या अपहरणाच्या घटनांनी महाराष्ट्र हादरला आहे.दुसरीकडे, मराठवाड्यात अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असताना सरकार केवळ भोंदू बाबांच्या मागे लागल्याची टीका विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत केली.विधानसभेत स्थगन प्रस्ताव मांडत असताना वडेट्टीवार यांनी ब्रह्मपुरीसह राज्यातील सुरक्षिततेच्या प्रश्नावर सरकारला धारेवर धरले.ब्रह्मपुरी शहरात गेल्या काही दिवसांत १० वी आणि १२ वी मध्ये शिकणाऱ्या ६ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याची धक्कादायक माहिती वडेट्टीवार यांनी दिली. यापैकी केवळ २ मुलींचा तपास लागला असून ४ मुली अजूनही बेपत्ता आहेत.सरकार सीसीटीव्हीसाठी कोट्यवधी रुपये खर्च करते, मग तालुका स्तरावर या व्यवस्था कुठे आहेत? मुलींचे अपहरण होत असताना आणि त्यांचे मोबाईल बंद असताना पोलीस यंत्रणा काय करत आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.शाळा-महाविद्यालयांमध्ये मुलींच्या सुरक्षिततेबाबत प्रबोधन करण्याची गरज असून, बेपत्ता मुलींचा शोध घेण्यासाठी विशेष पथकाची तात्काळ नियुक्ती करावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.



राज्यात अवकाळी आणि गारपीट झाली. मराठवाड्यात झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे हजारो हेक्टर वरील रब्बी पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. नांदेड, हिंगोली, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातील स्थिती अत्यंत गंभीर आहे. या नैसर्गिक आपत्तीत ४१ जनावरे दगावली असून २ लोकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. शेतकरी अडचणीत असताना सरकार केवळ कर्जमाफीच्या पोकळ गप्पा मारत आहे. अद्याप अनेक ठिकाणी पंचनामेही सुरू झालेले नाहीत. सरकारने तात्काळ निवेदन करून बाधित शेतकऱ्यांना मदत करण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली. राज्यात शेतकरी मरत आहे, मुली सुरक्षित नाहीत, पण सरकार मात्र भोंदू बाबांच्या मागे धावण्यात धन्यता मानत आहे. पालकांचा आक्रोश सरकारला ऐकू येत नाही का?असा संतप्त सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

# जिल्हा बँकेच्या निवडणूकीत करप्ट प्रॅक्टिस वापर मतदार यादी अपूर्ण, निवडणूक निरीक्षक नाही

## राज्य सहकारी संस्था निवडणूक प्राधीकरणाचे दुर्लक्ष का?

प्रतिनिधी २४ मार्च

**अकोला:** दि अकोला वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अकोला यांच्या व्यवस्थापन समितीच्या सुरु असलेल्या निवडणूकीत अनेक गैरप्रकार अधोरेखित होत आहे. केवळ विशिष्ट गटाला विजयी करण्यासाठी सहकार विभाग कसे काम करत आहे आणि लोकशाही तसेच निवडणूक प्रणालीची कशी हत्या करत आहे, याचे उत्तम उदाहरण ही निवडणूक ठरत आहे. अपुर्ण मतदार यादी, निवडणूक निरिक्षकांशिवाय सुरु असलेली निवडणूक आणि राज्य सहकारी संस्था निवडणूक प्राधीकरणाचे या सर्व गैरप्रकार आणि अव्यवस्थेकडे अर्थपुर्ण दूर्लक्ष आणि चुप्पी यामुळे ही निवडणूक लोकशाही परंपरा आणि नियमांना धरुन नसल्याची ओरड कायम आहे. दरम्यान, या विषयावर जिल्हा उपनिबंधक सहकार गीतेशचंद्र साबळे यांनी आज ही कुठलीही प्रतिक्रिया दिली नाही.

दरम्यान, उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या (१८ मार्च) शेवटच्या दिवशी दू.३ वाजे पर्यंत अर्ज मागे घेता येत होता. पण, तब्बल ५.४५ वाजता संचालक पदाचे उमेदवार प्रा. अतुल पिलात्रे यांचा अर्ज मागे घेतल्याच्या व सिटी न्यूज सुपरफास्ट ने उपस्थित केलेल्या विविध मुद्याची चौकशी विभागीय सहनिबंधक सहकार गौतम वर्धन यांनी चौकशी सुरु केली आहे.



### मतदार यादीच अपुर्ण मग कशी निवडणूक?

अकोला जिल्ह्यातील अनेक सहकारी संस्थांना उदाहरणार्थ नागरी व कर्मचारी पतसंस्था, सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था, प्रक्रिया संस्था, अभिनव सहकारी संस्था ईत्यादिंचे खाते जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये आहेत. तथापि जिल्हा मध्यवर्ती बँकेने या संस्थांना अनेक वर्षापासून सभासदत्व दिले नाही. त्यामुळे अनेक संस्था या निवडणुकीमध्ये मतदार म्हणून डावलल्या गेल्या आहेत. त्यामुळे मतदार यादीच अपुर्ण आहे. यामुळे शासनाने हे निवडणूक रद्द करून चौकशी समिती नेमून सर्व संस्थांना सभासदत्व द्यावे व नंतरच निवडणूक प्रक्रिया राबवावी अशी मागणी होत आहे.

### निवडणूक निरिक्षक नेमण्यामागचे कारण काय

जिल्हा बँकेची निवडणूक ही अ गटात येते. यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था प्राधिकरणाने निवडणूक निरिक्षक नेमण्याची गरज आहे. पण, या निवडणुकीसाठी निरिक्षक का नेमला गेला नाही. हा धक्कादायक प्रश्न विचारला जात आहे. इतकेच नाही तर १८ मार्च रोजी अर्ज मागे घेताना लोकशाही आणि निवडणूक प्रक्रियेला गुंडाळण्यात आले. या सर्व निवडणुकीतील गैर प्रकारची गंभीर दखल राज्य सहकारी निवडणूक संस्था प्राधिकरणाने घेण्याची गरज आहे. सहकार विभागाने त्या दिवशीचे अत्यंत महत्वाचे सीसीटीव्ही फुटेज देण्यास नकार दिला गेला. या निवडणुक घोळात पगारदार सभासद म्हणून बँकेचे विद्यमान अध्यक्ष कसे काय निवडणुक लढवित आहे हा प्रश्न कायम आहे.

या विषयीचा रिपोर्ट मागण्यात येईल. तसेच ए आर ओ यांची चौकशी होईल असे सिटी न्यूज सुपरफास्ट सोबत बोलताना गौतम वर्धन यांनी स्पष्ट केले. तर या प्रकरणात महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था प्राधिकरणाचे आयुक्त अनिल कवडे व सचिव अशोक गाडे यांच्या संपर्क केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही. जिल्हा बँकेच्या निवडणूकीत मोठ्या प्रमाणात गैर प्रकार होत असताना त्याकडे सहकारी संस्था प्राधिकरणाचे अधिकारी दूर्लक्ष का करत आहे असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# सोन्या-चांदीच्या किमतीत मोठी घसरण!



वृत्तसंस्था २४ मार्च

**नवी दिल्ली :** सोन्या-चांदीच्या किमतींसाठी या आठवड्याची सुरुवात मोठ्या घसरणीने झाली आहे. सोमवारी देशांतर्गत कमोडिटी मार्केटमध्ये मोठे चढ-उतार पाहायला मिळाले, त्यानंतर मंगळवार, २४ मार्च रोजीदेखील मोठी घसरण नोंदवली जात आहे. मल्टी कमोडिटी एक्सचेंज ऑफ इंडिया (एमसीएक्स) वर आज सोन्याचा भाव १,३७,०३२ रुपये प्रति १० ग्रॅम आणि चांदीचा भाव २,१७,०२६ रुपये प्रति किलोवर आला आहे.

### मध्य पूर्वेतील वाढता भू-राजकीय तणाव

सोमवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या वीज प्रकल्पांवरील हल्ले ५ दिवसांसाठी पुढे ढकलण्याची घोषणा केली. यामुळे मध्य पूर्वेतील वाढता तणाव कमी होत असल्याचे वाटत होते. मात्र, मंगळवारी इराणनं उत्तर दिले की त्यांनी अमेरिकेसोबत कोणत्याही प्रकारची चर्चा केलेली नाही. यामुळे पुन्हा भू-राजकीय तणाव वाढताना दिसत आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या विधानानंतर कच्च्या तेलाच्या किमतीत १० टक्क्यांहून अधिक घसरण झाली होती, परंतु आज पुन्हा तेजी परतली आहे. त्यामुळेच सोने-चांदीसारख्या मौल्यवान धातूंवर दबाव वाढताना दिसत आहे.

देशांतर्गत वायदा बाजारात आज बाजार उघडल्यानंतर सोन्याच्या किमतीत २,२४८ रुपये प्रति १० ग्रॅम आणि चांदीच्या किमतीत ८,३९७ रुपये प्रति किलोची मोठी घसरण नोंदवण्यात आली. सोमवारी एमसीएक्सवर सोन्याची किंमत १,३९,२८० रुपये प्रति १० ग्रॅम आणि चांदीची किंमत २,२५,४२३ रुपये प्रति किलोवर बंद झाली होती. २९ जानेवारी २०२६ रोजी सोने आणि चांदीच्या किमतींनी आतापर्यंतचा उच्चांकी स्तर गाठला होता. तेव्हा सोन्याचा भाव १,८०,००० रुपये प्रति १० ग्रॅमवर पोहोचला होता. म्हणजेच, आपल्या ऐतिहासिक विक्रमापासून सोनं ४२,९६८ रुपयांनी खाली आले आहे.

# युद्धाची झळ आता सामान्यांच्या किचनपर्यंत पोहोचली- शरद पवार

प्रतिनिधी २४ मार्च

**मुंबई :** सध्या आखाती देशात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात तीव्र युद्ध सुरु आहे. यामुळे भारताला इंधन टंचाईचा सामना करावा लागत आहेत. युद्धाची झळ आता केवळ सीमेपुरती मर्यादित नसून ती सामान्यांच्या किचनपर्यंत पोहोचली आहे. तसेच भारताला येणाऱ्या काळात मोठ्या टंचाईचा सामना करावा लागू शकतो, अशी भीती राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केली आहे.

राज्यसभेच्या निवडणुकीत महाविकासआघाडीच्या आमदारांनी एकमताने शरद पवारांनी निवडून दिले. या



निवडणुकीत मिळालेल्या विजयानंतर त्यांनी महाविकासाआघाडीतील सर्व आमदारांसाठी स्नेहभोजन व बैठकीचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी जागतिक स्तरावरील गंभीर घडामोडींवर प्रकाश टाकला. यावेळी गॅस आणि इंधन टंचाईचे संकटावर भाष्य केले. जागतिक राजकारणात आखाती देशांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे.

## धर्मांतर केल्यास अनुसूचित जातीचा दर्जा कायमचा संपणार!

वृत्तसंस्था २४ मार्च

**नवी दिल्ली :** आरक्षणाचे फायदे आणि अनुसूचित जातीच्या दर्जाबाबत सर्वोच्च न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निकाल दिला आहे. जर एखादी व्यक्ती हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्म सोडून इतर कोणत्याही धर्मात (उदा. ख्रिश्चन किंवा इस्लाम) प्रवेश करत असेल, तर त्या व्यक्तीचा अनुसूचित जातीचा दर्जा आपोआप संपुष्टात येईल, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे आता ख्रिश्चन धर्म स्वीकारलेल्या व्यक्तींना अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याचा लाभ घेता येणार नाही.

# श्रींचे मंदिर उद्यापासून दोन दिवस भाविकांसाठी २४ तास खुले!

प्रतिनिधी २४ मार्च

**शेगाव :** धन्य आज दिन संत दर्शनाचा... श्री संत गजानन महाराज संस्थान शेगावच्या वतीने श्रीं रामनवमी उत्सवाकरिता श्रीचे मंदिर दर्शनसाठी दोन दिवस खुले राहणार आहे. यामुळे भाविक भक्तांना श्रींच्या समाधी मंदिराचे दर्शन घेता येणार आहे.

श्रीं राम नवमी उत्सवानिमित्त गेल्या आठ दिवसापासून मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. या सप्ताहामध्ये राज्यातील भजनी दिंड्या शेगाव येथे दाखल होत आहे. भजनी दिंड्यांमधील वारकरी भाविकांनी श्रीच्या समाधी मंदिराचे दर्शनासाठी २५ व २६ मार्च रोजी



श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले राहिल. श्रींच्या दर्शनासाठी होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेऊन हा निर्णय संस्थानच्यावतीने घेण्यात आला आहे.

# युद्धाच्या आगीतून दोन भारतीय टँकर सुखरूप बाहेर!

## ६५ लाख सिलिंडर गॅस, दोन दिवसात भारताच्या किनारपट्टीवर



वृत्तसंस्था २४ मार्च

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील युद्धाच्या वणव्यामुळे 'स्ट्रेंट ऑफ होर्मुज' या धोकादायक जलमार्गात अडकलेल्या भारतीय जहाजांच्या सुटकेला यश येत आहे. भारताचा तिरंगा असलेले दोन मोठे एलपीजी टँकर सोमवारी सकाळी इराण आणि ओमानमधील या अरुंद समुद्रधुनीतून यशस्वीपणे बाहेर पडले आहेत. हे दोन्ही टँकर पुढील दोन दिवसांत भारताच्या किनारपट्टीवर पोहोचण्याची शक्यता असून, यामुळे देशातील गॅस पुरवठ्याला मोठा आधार मिळणार आहे.

बंदर आणि नौवहन मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, 'पाइन गॅस' आणि 'जग वसंत' ही दोन जहाजे फारसच्या आखातातून मार्गस्थ झाली आहेत. या दोन्ही जहाजांवर एकूण ९२,६१२ टन एलपीजी आहे. या साठ्यातून देशातील सुमारे ६५.२१ लाख घरगुती गॅस सिलिंडर भरले जाऊ शकतात. विशेष म्हणजे, या दोन्ही जहाजांवर असलेला गॅस साठा हा भारताच्या एका दिवसाच्या संपूर्ण एलपीजी वापराइतका आहे.

### भारतीय खलाशांची सुखरूप घरवापसी

या दोन्ही जहाजांवर भारतीय खलाशांची मोठी फौज तैनात आहे. 'पाइन गॅस'वर ३३ तर 'जग वसंत'वर २७ भारतीय नाविक आहेत. पश्चिम आशियात युद्ध पेटल्यानंतर हे खलाशी तिथे अडकून पडले होते. आता ही जहाजे २६ ते २८ मार्च दरम्यान भारतीय बंदरांवर पोहोचतील, असा अंदाज बंदर, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी व्यक्त केला आहे.

### २२ जहाजे अजूनही बाहेर पडण्याच्या प्रतीक्षेत

इराणवर अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या हल्ल्यानंतर होर्मुजची सामुद्रधुनी जवळजवळ बंद झाली होती. युद्ध सुरू झाले तेव्हा भारताचा झेंडा असलेली एकूण २८ जहाजे या धोकादायक पट्ट्यात अडकली होती. गेल्या काही दिवसांत दोन्ही बाजूंनी प्रत्येकी दोन-दोन जहाजे बाहेर काढण्यात यश आले आहे. सुरुवातीला अडकलेल्या २८ पैकी २२ जहाजे अजूनही या भागात सुरक्षित बाहेर पडण्याच्या प्रतीक्षेत आहेत.

## अमेरिकेच्या सर्वात मोठ्या रिफायनरीमध्ये स्फोट!

वृत्तसंस्था २४ मार्च

**पोर्ट आर्थर :** अमेरिकेच्या टेक्सास राज्यातील पोर्ट आर्थर येथील 'वलेरो एनर्जी' या प्रचंड मोठ्या तेल रिफायनरीमध्ये सोमवारी रात्री उशिरा एक भीषण स्फोट झाला. रिफायनरीतील एका इंडस्ट्रियल हीटरमध्ये हा धमाका झाला असून, त्यानंतर संपूर्ण परिसरात आगीचा भडका उडाला आहे. या घटनेमुळे आकाशात काळपट धुराचे प्रचंड लोट पाहायला मिळत असून परिसरातील शहरांना मोठा धक्का बसला आहे. स्थानिक वेळेनुसार सायंकाळी ६:३० च्या सुमारास हा स्फोट झाला. हा इतका शक्तिशाली होता की त्याचे हादरे शेजारील ग्रोव्हस आणि नेदरलँड या शहरांमध्येही जाणवले. सुरक्षेचा उपाय म्हणून प्रशासनाने पोर्ट आर्थरमधील पश्चिम भागातील नागरिकांसाठी 'शेल्टर-इन-प्लेस' (घरातच राहण्याचे) आदेश जारी केले आहेत.

# अमेरिका-इराण युद्ध पुन्हा भडकणार! अमेरिकेने इराणच्या त्या दोन अटी नाकारल्या



वृत्तसंस्था २४ मार्च

**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी इराणविरुद्ध पाच दिवसांच्या शस्त्रसंधीची घोषणा केली होती. इराण आणि आमच्यात सध्या सकारात्मक चर्चा सुरु आहे. त्यामुळे इराणमधील वीज प्रकल्पांवर पुढील पाच दिवस हल्ले करणार नाही, अशी घोषणा डोनाल्ड ट्रम्प यांनी केली होती. ट्रम्प यांची ही घोषणा एकतर्फी असल्याची चर्चा रंगली होती. मात्र, आपल्याच घोषणेला काही तास उलटत नाही तोच आता डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला नवी धमकी दिली आहे. चर्चा निष्फळ झाली तर बॉम्बफेक करू, असे त्यांनी म्हटले आहे. इराणमध्ये सत्तांतर होईल, व्हेनेझुएलाप्रमाणे इराणमध्येही एक नेता शोधला जाईल, असे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले. मात्र, यावेळी ट्रम्प यांनी १५ कलमी कराराचा उल्लेख टाळला. इराणने अणुशस्त्र न बाळगण्यास सहमती दर्शवल्याचा दावा ट्रम्प यांनी केला.

### अशा आहेत इराणच्या दोन अटी

ट्रम्प यांना अटी घालण्याचा कोणताही अधिकार नाही, असे इराणने स्पष्ट केले आहे. इतर देशांच्या माध्यमातून अमेरिकेशी चर्चा सुरू आहे. मात्र, अमेरिकेने आमच्या दोन अटी मानण्यास नकार दिलाय, असे इराणने म्हटलंय. अमेरिकेने आम्हाला नुकसान भरपाई द्यावी, अशी इराणची पहिली मागणी आहे, तसेच अमेरिकेनेच प्रथम आक्रमण केल्याचे कबूल करावे, ही दुसरी मागणी इराणने केली होती. अमेरिकेने या दोन्ही अटी मानण्यास नकार दिल्याचे इराणचे म्हणणे आहे.

### ट्रम्प यांचा 'तो' दावा फेक न्यूज

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत चर्चा सुरू असल्याचा जो दावा केला होता, तो इराणने केवळ फेटाळलाच नाही, तर त्याला 'फेक न्यूज' ठरवलं आहे. इराणची अधिकृत वृत्तसंस्था 'आयआरआयबी'ने ट्रम्प यांच्या विधानाला 'सायकोलॉजिकल ऑपरेशन्स' म्हणजेच मानसिक युद्धनीती म्हटलंय. इतकंच नाही, तर इराणने आपला आक्रमक पवित्रा कायम ठेवत ७७ व्या म्हणजेच मिसाईलचा मारा केल्याची खळबळजनक माहिती समोर येत आहे.

सिटी न्यूज अमरावती
मंगळवार, दि. २४ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# गुरुकुंज मोझरी येथे 'मेरा युवा भारत' तर्फे शहीद दिन साजरा

**अमरावती:** भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतीवीर भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या बलिदानाच्या स्मृतीनिमित्त 'मेरा युवा भारत' तर्फे आज गुरुकुंज मोझरी येथे 'शहीद दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.

भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयांतर्गत असलेल्या 'मेरा युवा भारत' अमरावती कार्यालयाच्या वतीने श्रीगुरुदेव अध्यात्म केंद्र, गुरुकुंज मोझरी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करून शहिदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी परिसरात स्वच्छता अभियान राबवून स्वच्छतेचा संदेश दिला, तसेच 'भगतसिंग अमर रहे' अशा घोषणा देत पदयात्रा काढली.

या कार्यक्रमाप्रसंगी श्रीगुरुदेव अध्यात्म केंद्र गुरुकुलचे संचालक रविदादा मानव यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित केले, तर प्रास्ताविक प्रा. अंकुश मानकर यांनी केले.

# महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची उच्च प्राथमिक शाळा क्र. २ मसानगंज येथे पाहणी

## ♦ आयुक्त यांचे तातडीने सुधारणा करण्याचे आदेश

प्रतिनिधी २४मार्च

**अमरावती :** अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज महानगरपालिका उच्च प्राथमिक हिंदी शाळा क्र.२, मसानगंज येथे शाळेची जुनी इमारत आणि परिसरातील स्वच्छतेची पाहणी केली.

पाहणीदरम्यान निदर्शनास आले की शाळेची इमारत अनेक ठिकाणी धोकादायक स्थितीत असून काही ठिकाणी मोडकळीस आलेली आहे. ही परिस्थिती विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी गंभीर धोकादायक आहे. तसेच या कारणास्तव शाळेत विद्यार्थ्यांची संख्या अपेक्षेनुसार वाढत नसल्याचे आढळले.



आयुक्तांनी या परिस्थितीवर त्वरित लक्ष देण्यासाठी शाळेचे बिल्डिंग ऑडिट करून तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश महानगरपालिकेचे अभियंता लक्ष्मण पावडे यांना दिले. या अहवालानंतर शाळेच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक तो योग्य तो उपाय लवकरात लवकर राबवण्याचे निर्देश देखील देण्यात आले. याचबरोबर, आयुक्तांनी शाळेच्या आवारातील आणि परिसरातील स्वच्छतेची देखील सविस्तर पाहणी केली. पाहणीदरम्यान आढळले की शाळेच्या आवारात कचरा टाकला जात असल्याचे निदर्शनास आले. यावर त्वरित कारवाईसाठी आयुक्तांनी मसानगंज स्वच्छता निरीक्षक श्री. शेख यांना शाळेच्या आवारात कचरा टाकू नये असे कडक आदेश दिले. तसेच शाळेच्या आवारात कचरा टाकल्या जाणाऱ्या ठिकाणी वॉल-कंपाऊंड तयार करून कचरा व्यवस्थापनासाठी योग्य उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहेत. आयुक्तांच्या भेटीवेळी मसानगंज नवनिर्वाचित नगरसेवक दिपक साहू व शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम उपस्थित होते. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी शाळेच्या सुरक्षिततेसाठी, विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी व परिसरातील स्वच्छतेसाठी तातडीने आणि योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

# बौद्धांनी पोट जातीच्या बेड्या तोडाव्या: नयन मोंढे

## ♦बौद्ध वधू-वर मेळाव्यात उसळला जनसागर ♦१५२ युवक-युवतींनी दिला परिचय

प्रतिनिधी २४ मार्च

**अमरावती:** लग्नाच्या वेळी अजूनही पोटजाती पाहिली जाते, ही समाजासाठी लाजिरवाणी बाब आहे. बौद्धांनी पोट जातीच्या बेड्या तोडणे ही काळाची गरज आहे असा थेट आणि आक्रमक इशारा देत नयन मोंढे यांनी बौद्ध समाजातील पोट जाती मानणाऱ्या परंपरांवर जोरदार प्रहार केला.



१५२ युवक-युवतींनी परिचय दिला तर शेकडो उपवधू वरांची मोफत नोंदणी करण्यात आली. भीम टेकडी परिसरातील सबोधी: डॉ. बाबासाहेब आंबेडकर संस्कार भवन येथे आयोजित राज्यस्तरीय निशुल्क बौद्ध वधू-वर परिचय व नोंदणी मेळाव्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. तब्बल १५२ युवक-युवतींनी सहभाग घेत आपला परिचय दिला, त्यामुळे मेळाव्याचे वातावरण उत्साहपूर्ण झाले. मेळाव्याचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे विदर्भ अध्यक्ष तथा भारतीय बौद्ध महासभेचे पर्यटन प्रचार सचिव नयन मोंढे यांच्या हस्ते पार पडले, तर अध्यक्षस्थानी युवा नेते रुग्णसेवक सुरेश तायडे होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये ॲड. सिद्धार्थ गायकवाड, नगरसेवक मंगेश मनोहरे, डॉ. निर्मल सरदार, निशांत बनसोड, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.एकूणच, बौद्ध समाजातील पोटजातीच्या प्रश्नावर थेट हल्ला चढवत या मेळाव्याने केवळ विवाह जुळवणीच नाही तर सामाजिक परिवर्तनाचा ठोस संदेश दिला आहे.

### अपेक्षा कमी ठेवा: सिद्धार्थ दामोदरे

पालकांनी अवास्तव अपेक्षा न ठेवता निर्व्यसनी व अनुरूप जोडीदार मिळाल्यास लग्न जुळवावे. या मेळाव्याचा उद्देश गरीब, शेतकरी, मजूर आणि घटस्फोटित व्यक्तींनाही योग्य जोडीदार मिळवून देणे हा आहे. असे मुख्य आयोजक सिद्धार्थ दामोदरे यांनी स्पष्टपणे सांगितले.

या प्रसंगी नगरसेवक मंगेश मनोहरे, पत्रकार उज्वल भालेकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

# ईद मिलन सोहळा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी २४ मार्च

**अमरावती:** 'सबके लिए खुला है मंदिर यह हमारा, आओ कोई भी धर्मी आओ कोई भी पंथी' या राष्ट्रसंतांच्या समतेचा संदेश देणाऱ्या विचारांच्या प्रेरणेने आयोजित करण्यात आलेला ईद मिलन सोहळा सर्वधर्म समभाव, हिंदू-मुस्लिम ऐक्य, राष्ट्रीय एकात्मता आणि मानवतेचा संदेश देत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

राधानगर येथील गुरुदेव सेवाश्रम ट्रस्ट येथे या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम गुरुदेव सेवाश्रम ट्रस्ट, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, संविधान जागर अभियान आणि जमात-ए-इस्लामी हिंद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक व गुरुदेव सेवाश्रम ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. सतीश तराळ होते. तर उद्घाटक म्हणून गाडगेनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. दिलीप काळे (संत गाडगेबाबा अध्यासन प्रमुख, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ) उपस्थित होते. यावेळी मेहराज खान (सामाजिक कार्यकर्ते), अनिला काझी (कार्यकारी सदस्य, अंजुमन मुस्लिम ख्वातीन), नजमा काझी (क्रांती नवनिर्मिती संघटन), ज्योती राठोड (आधार बेघर निवारा), तसेच मिर्झा गफ्फार बेग, रफिक अहमद (जमात-ए-इस्लामी हिंद), याह्या खान पठाण (सामाजिक कार्यकर्ते) आणि राजीव बसवनाथे (जिल्हा कार्यवाह, संविधान जागर विभाग – महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती) यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांवरील प्रेरणादायी गीताने करण्यात आली. या प्रसंगी सर्व संघटनांच्या वतीने वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात डॉ. सतीश तराळ म्हणाले की, जगातील अनेक देश धर्माधिष्ठित असले तरी भारत हा निधर्मी व बहुसांस्कृतिक देश आहे.

# जिल्ह्यात एल.पी.जी. गॅसचा मुबलक साठा; अफवांवर विश्वास न ठेवण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

प्रतिनिधी २४मार्च

**अमरावती:** मध्यपूर्व आशिया, अमेरिका व युरोपियन खंडात सध्या सुरू असलेल्या युद्ध परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्यातील इंधन पुरवठ्याबाबत खबरदारीचा उपाय म्हणून जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यात कार्यरत असलेल्या बीपीसीएल (BPC), एचपीसीएल , व आयओसीएल या तिन्ही कंपन्यांच्या एल.पी.जी. गॅस सिलेंडर वितरकांची बैठक घेऊन आढावा घेतला. जिल्ह्यामध्ये एल.पी.जी. गॅस सिलेंडर साठा पुरेसा उपलब्ध असून नागरिकांना बुकिंगनंतर लवकरात लवकर 'फर्स्ट इन फस्ट आउट' (इघ्इध्) ऑर्डरनुसार सिलेंडर उपलब्ध होईल. तसेच गॅस एजन्सीवर गर्दी होऊ नये, यासाठी टोकन सिस्टीम लागू करावी. तसेच बुकिंगनंतर ८ दिवसांचे आत ग्राहकाला सिलेंडर उपलब्ध होईल, असे नियोजन करण्याबाबत संबंधित यंत्रणेला सूचना करण्यात आल्या आहेत. जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन तसेच ऑईल कंपन्या मिळून जिल्ह्यातील एल.पी.जी. गॅस सिलेंडर साठा पुरेसा उपलब्ध राहील याबाबत कटीबद्ध आहेत. त्यामुळे गॅस एजन्सीवर अनावश्यक गर्दी टाळावी तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. जिल्ह्यात पुरेसा साठा उपलब्ध असून त्याचा नियमित व सुरळीत पुरवठा करण्यात येईल.

### तक्रारीसाठी तालुकानिहाय संपर्क क्रमांक जाहीर

सिलेंडरच्या वितरणात काही अडचणी उद्भवल्यास नागरिकांनी तात्काळ संबंधित तालुकानिहाय नियुक्त केलेल्या खालील अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. यामध्ये जिल्हा हेल्पलाईन क्रमांक ७२१९१११४२४ असून, अमरावती शहरासाठी प्रविण राऊत (९६७३१६१९७५), मोर्शी तालुक्यासाठी सागर बगाडे (८६००८५६४३१), नांदगाव खंडेश्वर तालुक्यासाठी शीतल राठोड (९४२१८६९९९५), वरुड तालुक्यासाठी निखील नलावडे (९८२२५०८४०३), अंजनगाव सुर्जी तालुक्यासाठी रणजीत रामाघरे (९५११७१५१९२), चांदूर बाजार तालुक्यासाठी जितेंद्र पाटील (९३५६७४२५२८) यांची नेमणूक करण्यात आली आहे, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांनी केले आहे.

# मृत्यूच्या कड्यावरून 'माऊली'ची सुटका; पोलिस- अग्निशमन दलाने वाचवले दोन जीव

प्रतिनिधी २४ मार्च

**अमरावती :** शहरातील न्यू हायवे खदान परिसरात आज दुपारी काळजाचा ठोका चुकवणारी घटना घडली. एका आठ महिन्यांच्या गर्भवती महिलेने आत्महत्येच्या उद्देशाने थेट डोंगराचा कडा गाठला. भर उन्हात निसरड्या आणि धोकादायक वाटेवरून ती वर चढल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

डोंगराच्या टोकावर उभी असलेली ही महिला पाहून नागरिकांनी गोंधळ न घालता शिताफीने फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याला माहिती दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन गाडगे नगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक डी.पी. गणेश शिंदे, फ्रेजरपुरा पोलीस कर्मचारी आणि अग्निशमन दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी पोहोचले.

डोंगराचा उंच कडा आणि महिलेची नाजूक अवस्था लक्षात घेता बचावकार्य मोठे आव्हान होते. मात्र पोलिसांनी आणि जवानांनी संयम आणि धाडस दाखवत डोंगर चढून त्या महिलेपर्यंत पोहोचले. शिताफीने तिला ताब्यात घेऊन सुरक्षित खाली आणण्यात यश आले.

यानंतर त्या गर्भवती महिलेला तातडीने इर्विन रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेमुळे काही काळ परिसरात तणाव निर्माण झाला होता, मात्र सुखरूप सुटका झाल्याने सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला.

# जिल्हाधिकारी कार्यालयात शहिद दिनानिमित्त अभिवादन



प्रतिनिधी २४ मार्च

**अमरावती:** जिल्हाधिकारी कार्यालयात शहिद दिनानिमित्त अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दानेज यांनी शहिद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे, जिल्हा खनीकर्म अधिकारी प्रणिता चापले, अधिक्षक निलेश खटके, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा आदी उपस्थित होते. यावेळी संपूर्ण वंदे मातरम् या राष्ट्रगीताचे गायन उपस्थित अधिकारी-कर्मचारी यांनी केले.

# स्व.सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे पाटील राज्यस्तरीय उत्कृष्ट वाड्.मय निर्मिती पुरस्कारांची घोषणा

## ♦ झाडीबोली महर्षी ज्येष्ठ साहित्यिक मा.डॉ.हरिश्चंद्र बोरकर यांना साहित्यव्रती पुरस्कार

प्रतिनिधी २४ मार्च

**अमरावती :** मातोश्री स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे पाटील ट्रस्ट,अमरावती यांच्यावतीने दिल्या जाणाऱ्या २०२५च्या उत्कृष्ट वाड्.मय निर्मिती राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली असून यावर्षी सुप्रसिद्ध साहित्यिक, झाडीबोलीमहर्षी, .डॉ.हरिश्चंद्र बोरकर साकोली जिल्हा भंडारा यांना 'साहित्यव्रती' पुरस्काराने सन्मानीत करण्यात येणार आहे. विविध साहित्य प्रकारासाठी राज्यातील साहित्यिकांना सन्मानीत करणारी विदर्भातील ही मोठी पुरस्कार योजना आहे. या पुरस्कारांमध्ये उत्कृष्ट कादंबरीसाठीचा पुरस्कार रश्मी



पदवाड मदनकर, नागपूर यांच्या 'कायांतर' या कादंबरीला देण्यात आला आहे तर उत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार क्षितिज देसाई, ठाणे 'शीतपेटीतून जेव्हा जाग येते' या कथासंग्रहाला मिळाला आहे. रत्नागिरीच्या कविता मोरवणकर यांच्या 'उद्याचा दहशतगर्द अंधार' या कवितासंग्रहाला व गडचिरोली येथील प्रभू राजगडकर यांच्या ठयेथे आमचाही श्वास कोंडतोठ आहे यांना पुरस्कार जाहीर झाला. सोलापूरचे डॉ.शिवाजी शिंदे यांचा समीक्षाग्रंथ 'निवडक स्त्री आत्मकथने-सामाजिक सत्व आणि स्वत्व' हा समीक्षा ग्रंथ व उत्कृष्ट संपादनासाठी 'अक्षयआंदण' (शिवा राऊत यांची कविता) या ग्रंथाची निवड झाली आहे.

# उन्हाळ्याची चाहूल लागताच टरबूज-खरबुजांची बाजारात धूम; रस्त्यांवरच रसदार फळांची विक्री

प्रतिनिधी २४ मार्च

**अमरावती :** शहरात उन्हाचा पारा चढताच बाजारपेठेत टरबूज आणि खरबुजांची मोठ्या प्रमाणात आवक झाली असून सर्वत्र या फळांची लगबग पाहायला मिळत आहे. ही फळे आपल्याला फक्त उन्हाळ्यातच बघायला आणि खायला मिळतात, त्यामुळे नागरिकांचा कल सध्या या रसाळ फळांकडे मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

मोठमोठ्या वाहनांतून टरबूज-खरबुज शहरात दाखल होत असून विक्रेते रस्त्यांच्या कडेला गाड्या लावून विक्री करताना दिसत आहेत. बाजारात या फळांना सध्या चांगला भाव मिळत असल्यामुळे



विक्रेत्यांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे.

उन्हाच्या कडाक्यात शरीराला थंडावा देणारी ही फळे खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी वाढत असून शहरातील प्रमुख रस्ते आणि चौकांवर टरबूज-खरबुज विक्रेत्यांची रांग लागल्याचे चित्र दिसत आहे. परिणामी, बाजारपेठेत सध्या उन्हाळी फळांची चांगलीच धूम पाहायला मिळत आहे.

इतरही रोजगार फळांची अमरावती शहरातील इतवारा बाजार, बस स्थानक परिसर, जुने कॉटन मार्केट, गाडगे नगर परिसरात विक्री सुरू असून ग्रामीण भागातल्या शेतकऱ्यांनी सुद्धा टरबूज व खरबूज बाजारपेठेत विक्रीसाठी आणले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

## खामगाव

# बस स्थानक परिसरात महिलेच्या गळ्यातील पोथ लंपास

## ♦ गत आठ महिन्यात २० ते २५ चोरीच्या घटना

प्रतिनिधी २४ मार्च

**खामगाव:** मलकापूर बस स्थानक परिसरात खामगाव येथे जात असलेल्या शेतकऱ्याच्या पत्नीच्या गळ्यातील पोत चोरट्याने लंपास केल्याची घटना आज दि. २३ मार्च रोजी सकाळी ११.३० दरम्यान घडली. मलकापूर परिसरात गत आठ महिन्यात २० ते २५ चोरीच्या घटना घडल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या बाबत सविस्तर वृत्त असे की, शेतकरी राजेश सुधाकर मांडवाले हे आपल्या पत्नी स्मिता व मुलांना खामगाव येथे नातेवाईकांकडे पाठविण्यासाठी मलकापूर बस स्थानक येथे आले होते. दरम्यान राळेगाव ला जाणारी बस क्रमांक एम एच १४ एम पी ९२२३ या बस मध्ये चढत असताना पत्नीच्या गळ्यातील मंगळसूत्र ओढून चोरीला गेल्याचे समजले. तेव्हा आरडा ओरड केला असता काही समजण्याआधीच चोरटा त्या ठिकाणावरून लंपास झाला.

बस स्थानक परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस कर्मचारी कार्यरत असणे आवश्यक असताना त्या ठिकाणी पोलीस कर्तव्यावर नव्हते तर परिसरात प्रवाशांची वर्दळ चांगलीच असल्याने सीसीटीव्ही कॅमेरे सुद्धा आवश्यक असताना परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे सुद्धा नाही. त्यामुळे अशा चोरीच्या घटना होण्यासाठी एक प्रकारे प्रोत्साहनच मिळत आहे. मलकापूर शहरासह तालुक्यात चोरीच्या घटना दिवसेंदिवस वाढतच चालल्या आहे. एवढ्या घटना होत असताना सुद्धा प्रशासन या विषयाची दखल का घेत नाही असा प्रश्न निर्माण होत आहे.

मलकापूर शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांच्यासोबत संपर्क साधला असता अपुऱ्या कर्मचाऱ्यांनी बंदोबस्त व व्यवस्था कशी करावी असा प्रश्न आमच्या समोर असतो. तरी आम्ही आमच्या परीने प्रयत्नशील राहून योग्य तो तपास करीत आहे. असे सांगितले.

फिर्यादी राजेश सुधाकर मंडवाले यांनी दिलेल्या तक्रारीवरून मलकापूर शहर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहे.

# खामगाव मध्ये सिलेंडर करता लागल्या लांब रांगा

प्रतिनिधी २४ मार्च

**खामगाव:** अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धामुळे व्यावसायिक गॅस पुरवठा बंद करण्यात आला आहे. त्यामुळे हॉटेल व्यवसायासह मंगल कार्यालये, कॅटरिंग व्यवसायालाही याचा मोठा फटका बसला आहे. गॅसपुरवठा होत नसल्याने काहींनी चुलीवर आहे. तर काहींनी विजेवरील गस शेगडीला ही मागणी वाढली स्वयंपाक करण्यास प्रारंभ केला असल्याचे स्पष्ट होत आहे.

आता लग्नाच्या ऑर्डर असल्याने कॅटरर्स चुलीकडे वळले



असून वराडींना चुलीवरच्या जेवणाचा आस्वाद घेता येणार.आहे. घरगुती गॅस वितरणाबाबत कोणतीही अडचण नसल्याचा निर्वाळा प्रशासनाकडून वारंवार देण्यात येत असला, तरी सिलिंडरसाठी रांगाच रांगा दिसून येत आहेत. घरगुती गॅस उपलब्ध होत असले तर व्यावसायिक सिलिंडर मात्र बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे हॉटेल व्यावसायिकांना मंगल कार्यालये, कॅटरर्स चालकांचा व्यवसाय अडचणीत आला आहे.

काम बंद करता येणार नसल्याने काहींनी तर आपला मोर्चा चुलीकडे वळविल्याचे दिसत आहे. तर काहींनी इलेक्ट्रीक भट्टी ऑर्डर केली असून काहीही करून माघार घ्यायची नाही, असा पवित्रा घेतला आहे. यामुळे त्रास होणार असला तरी घेतलेली ऑर्डर पूर्ण करण्यासाठी व काम सुरू ठेवण्यासाठी कित्येक कॅटरर्सनी कंबर कसली आहे.

सिटी न्यूज अकोला
मंगळवार, दि. २४ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# पशु-पक्षींसाठी मोफत दाना-पाणी पात्र वितरण

**अकोला :** नववर्ष चैत्रिचंडाच्या पवित्र अवसरानिमित्त वाहेगुरू सेवा समितीच्या व मनपा उपायुक्त विजय परतवार यांच्या सहकार्याने पशु-पक्षींसाठी मोफत दाना-पाणी पात्र वितरण उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमाची सुरुवात पुलिस निरीक्षक मनोज केदारे व मनपा उपायुक्त विजय परतवार यांच्या उपस्थितीत झाली. पूज्य सिंधी जनरल पंचायतीचे माजी अध्यक्ष कन्हैयालाल रंगवानी यांनी अतिथींच्या हस्ते जलपात्रांचे वितरण सुरू केले. नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत जलपात्रांचा लाभ घेतला. वाढत्या उन्हाळ्यात पशु-पक्षींसाठी दाना-पाण्याची व्यवस्था करण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. या निस्वार्थी सेवाभावी कार्याला यशस्वी करताना समितीचे अध्यक्ष हरीश पारवानी, सेवाकार्यकर्ते राजकुमार मिर्चला, हरीश मिर्चला, प्रभु सैनानी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## नियोजनभवनात सामूहिक गायन; शहिदांना अभिवादन



**अकोला:** 'वंदे मातरम' गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाल्याबद्दल जिल्ह्यात विविध ठिकाणी सामूहिक गायन आयोजित करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयात नियोजनभवनात 'वंदे मातरम'चे सामूहिक गायन झाले. थोर क्रांतिकारक शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड , मनपा आयुक्त डॉ सुनील लहाने, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे यांच्यासह जिल्ह्यातील तहसीलदार उपस्थित होते. सर्व जनमानसात देशभावना जागृत होण्यासाठी या गीताने महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. हे गीत स्वातंत्र्यलढ्याचा आत्मा ठरले. आजही व सदैव हे गीत युवकांसाठी स्फूर्तीदायी आहे, अशी भावना विविध मान्यवरांनी यावेळी व्यक्त केली.

## राजस्थानी सेवा संघाचे महानगरात कवी संमेलन संपन्न

**अकोला:** राजस्थानी सेवा संघाच्या वतीने राजस्थानी दिनावर महानगरात राष्ट्रीय हिंदी कवी संमेलन संपन्न झाले.गांधी रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुले नाट्यगृहात संपन्न या राष्ट्रीय हिंदी कवी संमेलनात राष्ट्रीय कवि आशकरण अटल मुंबई,चंदन राय कानपुर,मदन मोहन समर भोपाल,आणि मनीष वाजपेई नागपुर हे कवी उपस्थित होते.सेवा संघाचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल यांच्या अध्यक्षतेत संपन्न या राष्ट्रीय कवी संमेलनाचा प्रारंभ आ. वसंत खंडेलवाल, माजी आ. बबनराव चौधरी, माजी महापौर मदन भरगड, जिनगर समाज अध्यक्ष दीपक साकला आदी समाज प्रमुख उपस्थित होते.

## निधन वार्ता

### कामिनीबाई अडोकार



**अकोट:** तालुक्यातील वडाळी देशमुख येथील प्रतिष्ठित नागरिक जनार्धन अडोकार यांचे आई सोमवार २३ ला सायंकाळी पाच वाजता राहत्या घरी वय ९० व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन नातू व दोन सुना असा नातवंडाचा मोठा आप्त परिवार परिवार आहे.

# चोहोट्टा बाजार आसरा देवी संस्थानवर नवरात्रीला प्रारंभ

प्रतिनिधी २४ मार्च

**अकोट:** चौहटा बाजार परिसरामध्ये अनेक वर्षांपासून कार्यरत असणार तीर्थक्षेत्र म्हणून बऱ्याचवर्षापासून मोठ्या भक्ती भावाने आसरा देवीचा नवरात्र उत्सव श्रीमती आशाताई वावरे व त्यांचा परिवार हे गुढीपाडव्यापासून प्रारंभ साजरा करतात नवरात्रोत्सवाचे उपवास हनुमान जयंती पर्यंत ठेवतात. त्याचप्रमाणे आसरा देवीच्या मंदिरामध्ये अनेक भाविक भक्तगण दर्शनाला हजेरी लावतात.देवीची महती ही फार काही वेगळ्या स्वरूपाची आहे. सात घोरपड यांच्या रूपामध्ये येऊन त्यांना स्थानापन्न केलेले आहे. व त्याबाबतचे दास फुले महाराज विदर्भ व्यास म्हणून २००१ एक आसरा देवीचा अध्याय सुद्धा प्रसिद्ध केला आहे त्या अध्यायामध्ये आसरा देवीची



पूर्णतः कहानी विशद केली आहे. चौहाहटा चोहृटा बाजारयेथे स्थानापंन्न झाल्यानंतर अनेक भाविक भक्तांचे रक्षण करून अनेक भक्तांना सद्बुद्धी पूर्वक मार्ग दाखविला २००१ पासून आश्रमाता देवीच्या स्थापना होऊन अनेक भाविक भक्तांना खूप मोठ्या प्रमाणात चमत्कार झालेत या बाबत परिसरामध्ये खूप मोठ्या प्रमाणात चर्चा आहे. त्यामुळे अनेक भाविक भक्तांचे आज रोजी आसरा माता संस्थान हे श्रद्धास्थान बनले आहे. त्यामुळे हाकेला धावणारी आसरा माता भक्तांच्या मनोकामना पूर्ण

### ♦ पंचक्रोशीतील भाविक दाखल

करते. त्यामुळे विविध भक्त नवस फेडण्याची प्रथा जोपासतात आजपर्यंत संस्थांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रम संस्थांच्या वतीने पार पाडण्यात येतात तसेच या धार्मिक स्थळाला अनेक लोकप्रतिनिधी प्रामुख्याने हजेरी लावतात गुढीपाडव्याला घटस्थापना होऊन धार्मिक कार्यक्रमांना आसरा देवी संस्थान मध्ये सुरुवात करण्यात आली आहे. अनेक भाविक भक्तांना या महत्त्वपूर्ण सामाजिक विविध कार्यामध्ये सहभाग नोंदवितात. त्यामुळे आसरा देवी संस्थान हे सर्वांच्या परिचयाचे आहे. प्रारंभ झालेल्या घटस्थापनेपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन सुद्धा संस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# राम मंदिरात श्री राम नवमीची जल्लोषात तयारी

प्रतिनिधी २४ मार्च

**हिवरखेड:** येथील राम मंदिरात येत्या गुरुवारी मोठ्या उत्साहात श्रीरामनवमी साजरी केली जाणार आहे., या उत्सवा निमित्त राम मंदिरावर आकर्षक अशी रोषणाई करण्यात आली. विविध प्रकाराची तोरणे करुन सजावट करण्यात आली. तसेच श्री राम जन्मोत्सव समिती हिवरखेडच्या वतीने विविध प्रकारचे आयोजन सुद्धा करण्यात आले आहे. राम नवमी उत्सव साजरा करण्यासाठी भाविकांमध्ये प्रचंड प्रमाणात उत्साह दिसून येत आहे.



# बँक भेटीद्वारे सहकार क्षेत्राची विद्यार्थ्यांना ओळख

प्रतिनिधी २४ मार्च

**तेल्हारा:** दिनांक १८ मार्च २०२६ रोजी डॉ. गोपाळराव खेडकर महाविद्यालय, गाडेगाव (ता. तेल्हारा) येथील वाणिज्य विभागाच्या वतीने बी.कॉम. प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आदित्य अनाघा मल्टी स्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी येथे बँक व्हिसिट आयोजित करण्यात आली. या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना सहकार क्षेत्राची रचना, कार्यपद्धती व व्यवहारातील प्रक्रिया यांची प्रत्यक्ष माहिती मिळावी हा होता. या प्रसंगी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. एम.




एम. कवरके, प्रा. स्वप्नील फोकमारे, प्रा. ताठोड व प्रा. प्रियाली चोपडे उपस्थित होते. ही भेट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाल ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडली.

या भेटीदरम्यान सोसायटीचे शाखा अधिकारी श्री. अग्रवाल साहेब यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून संस्थेची कार्यपद्धती, खाते उघडण्याची प्रक्रिया, कर्ज वितरण पद्धती, ठेवी योजना तसेच सहकारी संस्थांचे आर्थिक व्यवस्थापन याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना सहकार क्षेत्रातील विविध करिअर संधींबाबत मार्गदर्शनही केले.

विद्यार्थ्यांनी विविध विभागांना भेट देत प्रत्यक्ष कामकाजाचे निरीक्षण केले व आपल्या शंकांचे निरसन केले. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना सहकार क्षेत्राबद्दल अधिक सखोल व व्यावहारिक ज्ञान प्राप्त झाले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी शाखा अधिकारी श्री. अग्रवाल साहेब यांचे आभार मानले. अशा प्रकारच्या शैक्षणिक भेटींमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# मराठा महासंघाचे कै अण्णासाहेब पाटील यांना पुण्यतिथी दिनी अभिवादन

प्रतिनिधी २४ मार्च

**अकोला:** सुर्य ऊगवायच्या आत जर सरकारने माझ्या मराठा बांधवानां मराठा आरक्षण देण्याचा निर्णय घेतला नाही तर ऊद्याचा सुर्य मी बघणार नाही, हे सरकारला निक्षुण सांगत सकाळी स्वतः समाजासाठी पहिले बलिदान देणारे , मराठ्यांचा ढाण्या वाघ स्व.आण्णासाहेब पाटील यांच्या स्मृतिदिना निमीत्त अखिल भारतीय मराठा महासंघ अकोला जिल्हा शाखेच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. रतनलाल प्लॉट स्थित अखिल भारतीय मराठा महासंघाचे विभागीय अध्यक्ष यांच्या कार्यालयात घेण्यात आलेल्या कार्यक्रमात मराठा महासंघ जिल्हाध्यक्ष संजय सूर्यवंशी, क्रीडा विभाग



जिल्हाध्यक्ष राजेश पाटील महिला विभागीय अध्यक्ष कल्पनाताई बिडवे, जिल्हाध्यक्ष सौ सिंधुताई पवार, महानगर अध्यक्ष रश्मीताई पटेकर , सरचिटणीस अरुण खोटरे, महानगर सरचिटणीस प्रदीप लुगडे, उपाध्यक्ष प्रवीण शिंदे, प्रवीण कदम, उमेश सूर्यवंशी, काशिनाथ पटेकर आदि उपस्थित होते.

# राम नवमी उत्सव निमित्त वाहतूक व्यवस्थेत बदल करा

प्रतिनिधी २४ मार्च

**अकोला:** राम प्रगट उत्सव निमित्त २६ मार्च रोजी वाहतूक व्यवस्था वेगळी करावी. जुना कापड बाजार, गांधी चौक, सिटी कोतवाली तसेच तहसील कार्यालय पर्यंत दुचाकी वाहनांना सकाळी बारा ते रात्री बारा वाजता पर्यंत बंदी घालण्यात यावी. कारण शोभायात्रा तसेच राम मंदिरात येणाऱ्या भावी भक्तांना त्रास होणार नाही या दृष्टीने महानगरपालिका व पोलिस प्रशासनाने दखल घ्यावी अशी मागणी माजी नगरसेवक तथा भाजपा प्रसिद्धीप्रमुख गिरीश जोशी यांनी केली आहे.

तसेच दुचाकी वाहनासाठी गणेश घाट तसेच नगरपालिका शाळा क्रमांक एक आणि दोन इथे वाहनाची दुचाकी वाहनाची थांबण्याची व्यवस्था करण्यात यावी या दृष्टीने नियोजन महानगरपालिकेने करावे कारण मोठ्या संख्येत श्री प्रभू रामचंद्राचा प्रगट उत्सव दुपारी बारा वाजता होत असतो गांधी चौक छोटी राम मंदिर मोठे राम मंदिर या परिसरात मोठ्या प्रमाणात सकाळी ११ ते एक वाजता पर्यंत गर्दी असते. तसेच संध्याकाळी पाच ते रात्री बारा वाजता पर्यंत शोभायात्रा तसेच भक्तांची गर्दी लक्षात घेता वाहन व्यवस्था अशोक वाटिकेपासून जुन्या शहराकडे जाणाऱ्या वाहनांना राजेश्वर सेतू या मार्गाने करण्यात यावी तसेच सिटी कोतवाली इथे एकेरी रस्ता असल्यामुळे वाहतुकीला त्रास होईल त्यामुळे दरवर्षी सिटी कोतवाली मागील रोड गाड्या उभा राहत होता त्याचे दुचाकी वाहन शेती कोतवाली किंवा शाळा क्रमांक एक हिंदी शाळा तिथे उभे करण्याची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने महानगरपालिका व जिल्हा प्रशासनाने दाखल घ्यावी अशी मागणी केली.

# वाडेगावच्या गौरी चिंचोळकर यांना पीएच.डी.

प्रतिनिधी २४ मार्च

**वाडेगाव:** येथील रहिवासी सौ. गौरी चंद्रशेखर चिंचोळकर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी.



पदवी प्राप्त करून वाडेगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्यांनी 'इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांची मानसिकता व त्यांच्या शैक्षणिक विकासाबाबत पालकांच्या जागरूकतेचा चिकित्सक अभ्यास' या महत्त्वपूर्ण विषयावर आपले संशोधन पूर्ण केले.

बार्शी (जि. सोलापूर) येथील कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये डॉ. पी. ए. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हे कार्य तडीस नेले. गौरी चिंचोळकर यांचे हे संशोधन विशेषतः मराठी भाषा, मराठी शाळांचे अस्तित्व आणि पालकांची बदलती भूमिका यावर प्रकाश टाकणारे असून, ते समाज व शासनासाठी दिशादर्शक ठरणार आहे. त्यांनी यापूर्वी मराठी, इतिहास, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र अशा चार विषयांत एम.ए. आणि एम.एड. पदव्याही प्राप्त केल्या आहेत. त्यांच्या या यशाबद्दल प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. आर. ए. फुरडे, डॉ. एम. एस. डिसले, डॉ. एम. व्ही. मते, ग्रंथपाल डॉ. एस. एल. जाधव यांच्यासह वाडेगाव परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मूर्तिजापुरात रमजान ईदमध्ये घडले हिंदू मुस्लिम एकतेचे दर्शन

प्रतिनिधी २४ मार्च

### ♦ राहुल पाटील यांचा मुस्लिम समाजाच्यावतीने सत्कार

**मूर्तिजापूर :** मजहब नही सिखाता आपस मे बैर रखना हिंदी है हम वतन के हिंदुस्तान हमारा शहरातील स्टेशन परिसरात रमजान ईद निमित्त हिंदू मुस्लिम बांधवांची एकोप्याचे दर्शन घडून आणले आहे.



शाकंबरी प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष व संत गाडगे महाराज स्वच्छता अभियान मूर्तिजापुर प्रमुख सतीश अग्रवाल यांच्या संकल्पनेतून ईदनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. रमजान ईदनिमित्त मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात ३० दिवस रोजे ठेवून ईदच्या दिवशी विशेष नमाज अदा करतात. यानिमित्ताने स्टेशन परिसरात मोठ्या उत्साहाच्या वातावरणात हिंदू बांधवांनी मुस्लिम बांधवांना ईदी चे शुभेच्छा दिल्या व त्यांचे स्वागत केले. मस्जिदचे अध्यक्ष ॲड. शेख नसीर मौलाना जाहेद आलम मन्सूर राही यांच्या पुढाकाराने हिंदू बांधवांना दुपट्टे देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. ज्येष्ठ पत्रकार मनोहर पाठक, प्रा. अविनाश बेलाडकर, नगरसेवक सचिन देशमुख, राहुल पाटील, समाजसेवक सदाशिव शेळके, ज्येष्ठ पत्रकार दीपक अग्रवाल, प्रा. दीपक जोशी, अन्वर खान, नगरपरिषद उपाध्यक्ष रोहित अवलवार, त्रिलोक महाराज, रवी माडकर, हाजी मीरसाहेब , आरिफ ठेकेदार, आसिफ ठेकेदार, सय्यद जुनेद, सय्यद राजीम, मोहम्मद शरीक, निसार अहमद, मुजीब खान, कलीम खान, शे अजहर, शेख रफिक, मोहम्मद इमरान, युनूस खान, अमीर खान, शेख परवेज, शेख अलतमश, शेख शादाब शेख इरफान, इंजिनियर शेख फारुख शेख जुबेर व इतर मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अन्वर खान यांनी केले.

# औद्योगिक भेटीद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ज्ञानाचा अनुभव

प्रतिनिधी २४ मार्च

**तेल्हारा:** १६ मार्च २०२६ रोजी डॉ. गोपाळराव खेडकर महाविद्यालय, गाडेगाव (ता. तेल्हारा) येथील वाणिज्य विभागाच्या वतीने बी.कॉम. प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी लक्ष्मी ऑईल इंडस्ट्री, तेल्हारा येथे औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली. या औद्योगिक भेटीचे प्रमुख उद्दिष्ट विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष कामकाजाची माहिती मिळावी व त्यांच्या शैक्षणिक ज्ञानाला व्यावहारिक अनुभवाची जोड मिळावी हे होते. या प्रसंगी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. एम. एम. कवरके, प्रा. स्वप्नील फोकमारे, प्रा. ताठोड व प्रा. प्रियाली चोपडे उपस्थित होते. ही भेट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाल ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडली.




लक्ष्मी ऑईल इंडस्ट्रीचे संचालक श्री. अनुप पालीवाल यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून तेल उत्पादन प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली. त्यांनी कच्चा माल निवड, प्रक्रिया पद्धती, यंत्रसामग्रीचा वापर, गुणवत्ता नियंत्रण तसेच उत्पादनाच्या विपणन व्यवस्थेबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच उद्योग क्षेत्रातील करिअरच्या संधींबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी माहिती दिली.

विद्यार्थ्यांनी उद्योगातील विविध विभागांना भेट देत प्रत्यक्ष प्रक्रिया पाहिली व त्यांच्या शंका निरसनासाठी संचालकांसोबत संवाद साधला. या औद्योगिक भेटीमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून उद्योग क्षेत्राविषयीची समज अधिक दृढ झाली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी लक्ष्मी ऑईल इंडस्ट्रीचे संचालक श्री. अनुप पालीवाल यांचे आभार मानले. अशी औद्योगिक भेट विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# आकोलखेड येथे सप्तखंजेरीवादक पवनपाल महाराज यांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम

### ♦ श्री संत रुपलाल महाराज पुण्यतिथी महोत्सव

प्रतिनिधी २४ मार्च

**अकोट :** तालुक्यातील आकोलखेड येथे श्री संत रुपलाल महाराज पुण्यतिथी महोत्सव निमित्त सूर्यवंशी कावळ यात्रा समिती,ईश्वरगीरी गणेशोत्सव मंडळ व मित्र परिवार यांच्या व्दारा आयोजित सुप्रसिद्ध कीर्तनकार सत्यपाल महाराज



यांचे शिष्य पवनपाल महाराज वडाळीकर यांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम मंगळवार ता.२४ मार्च सायंकाळी ७ वाजता ईश्वरगीरी महाराज संस्थान आकोलखेड येथे आयोजित करण्यात आला आहे.पवनपाल महाराज आपल्या प्रभावी कीर्तन शैलीतून समाज प्रबोधनाचा संदेश देणार आहेत. अध्यात्म,संस्कार, सामाजिक मूल्ये आणि जनजागृती यावर आधारित विचार मांडले जाणार असून ग्रामस्थांना प्रेरणादायी मार्गदर्शन मिळणार आहे.तरी कीर्तनाचा लाभ घेण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सूर्यवंशी कावळ यात्रा समिती,ईश्वरगीरी गणेशोत्सव मंडळ, ईश्वरगीरी महाराज संस्थान तर्फे करण्यात आले आहे.

# चिमणी दिनानिमित्त पाणी पात्रे लावून जपली मुक्या पाखरांशी बांधिलकी

प्रतिनिधी २४ मार्च

**अकोला:** वैशाख वणव्याच्या झळा बसू लागल्या की मानवाची लाहीलाही होते, मग आकाशात मुक्त विहार करणाऱ्या इवल्याशा पाखरांची काय अवस्था होत असेल? हाच संवेदनशील विचार करून पक्षी मित्र सुनील गोहर यांनी गेल्या दोन दशकांपासून पक्षी संवर्धनाचा वसा जपला आहे.

जागतिक चिमणी दिनाचे औचित्य साधून, गोहर यांनी शहरात विविध ठिकाणी चिमण्यांसह सर्व पक्ष्यांसाठी स्वखर्चातून २०० जलपात्र लावण्याच्या मोहिमेचा श्रीगणेशा केला आहे.

२० वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय असलेले सुनील गोहर यांचा हा प्रवास केवळ अकोला जिल्ह्यापुरता मर्यादित नसून,



जिल्ह्याबाहेरही त्यांच्या कार्याचा सुगंध दरवळत आहे. त्यांनी अकोला शहराच्या विविध भागात २० हजारांहून अधिक वृक्षांचे केवळ रोपणच केले नाही, तर पोटच्या गोळ्याप्रमाणे त्यांचे संवर्धनही केले आहे. आज हेच वृक्ष हजारो पक्ष्यांचे हक्काचे घरटे बनले आहेत. त्यांच्या या निस्वार्थी कार्यात त्यांचे कुटुंब आणि मित्रमंडळी सोबत आहेत. पर्यावरणासोबतच दिव्यांगांना मदत, 'बेटी बचाव' मोहीम आणि व्यसनमुक्ती अशा सामाजिक आघाड्यांवरही त्यांनी आपला ठसा उमटवला आहे.

वाढत्या सिमेंटच्या जंगलात पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत आटत असताना, गोहर यांनी लावलेली ही पात्रे पाखरांसाठी जणू संजीवनी ठरत आहेत. उन्हाळ्यात पाण्यासाठी भटकंती करणाऱ्या पक्ष्यांना या उपक्रमामुळे मोठा आधार मिळाला आहे. कोणत्याही प्रसिद्धीचा हव्यास न धरता, स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करून सुरू असलेला हा 'ग्रीन पॅटर्न' मार्गदर्शक आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. २४ मार्च २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# अग्निशमन यंत्रणा 'धुळखात'; आपत्कालीन सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

प्रतिनिधी २४ मार्च







**महागाव :** महागाव नगरपंचायतीचा अग्निशमन विभाग सध्या स्वतःच अडचणीत सापडल्याचे चित्र समोर येत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून अग्निशामक बंब व 'बुलेट' गाडी धुळ खात पडून असल्याने शहरासह संपूर्ण तालुक्याची सुरक्षा अक्षरशः रामभरोशावर असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

कापूस हे मुख्य पीक असलेल्या महागाव तालुक्यात जिनिंग-प्रेसिंग उद्योग, मोठ्या व्यापारपेठा तसेच फुलसांवगीसारख्या बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणावर साठवणूक केली जाते. उन्हाळ्याच्या दिवसांत कोरड्या हवामानामुळे कापसाला आग लागण्याच्या घटना वारंवार घडतात. अशा वेळी तात्काळ अग्निशमन सेवा उपलब्ध नसल्यास काही मिनिटांत कोट्यवधींचे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे.

दरम्यान, आग लागल्यास पुसद, उमरखेड किंवा नांदेड येथून अग्निशामक बंब बोलवावा लागतो. या ठिकाणांचे अंतर ६० ते १०० किलोमीटर असल्याने मदत पोहोचण्यास मोठा विलंब होतो. परिणामी, नुकसान अधिक वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

महागाव शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर अपघातांचे प्रमाणही मोठे आहे. अनेकदा अपघातानंतर वाहनांना आग लागण्याच्या घटना घडतात. अशा प्रसंगी स्थानिक अग्निशमन यंत्रणा तत्काळ धावून जाणे अपेक्षित असते. मात्र, नगरपंचायतीचे अग्निशामक बंब आणि बुलेट गाडी अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

याशिवाय, अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक कर्मचारीही उपलब्ध नसल्याची चर्चा आहे. त्यामुळे यंत्रणा असूनही ती निष्क्रिय असल्याचे वास्तव समोर येत आहे.

नगरपंचायतीने केवळ प्रस्ताव कागदावर न ठेवता तातडीने प्रत्यक्ष कार्यवाही करून अग्निशमन सेवा सुरू करावी, अशी मागणी नागरिक, शेतकरी व व्यापाऱ्यांकडून जोर धरत आहे. अग्निशामक गाडी सुरू करण्याची प्रक्रिया लवकरच हाती घेण्यात येईल, अशी आशा व्यक्त केली जात असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीची प्रतीक्षा कायम आहे.

## ग्रीन पार्कमध्ये घरफोडी; दागिने व रोकड लंपास



प्रतिनिधी २४ मार्च

**आर्णी :** शहरातील उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या ग्रीन पार्क परिसरात दिवसाढवळ्या घरफोडी झाल्याने खळबळ उडाली आहे. अज्ञात चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १२ हजार ६९० रुपयांचा ऐवज लंपास केला.

याप्रकरणी लीलाधर अनंता ठाकरे (वय ५४, रा. ग्रीन पार्क, आर्णी) यांनी तक्रार दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार २० मार्च रोजी दुपारी २ ते २२ मार्च सकाळी ११ या कालावधीत त्यांचे घर बंद होते. याच दरम्यान चोरट्यांनी मुख्य दरवाजाचा कोंडा तोडून घरात प्रवेश केला.

घरात शिरल्यानंतर चोरट्यांनी बेडरूममधील कपाटाचे लॉक तोडून त्यातील सोन्या-चांदीचे दागिने तसेच सुमारे दोन हजार रुपये रोख रक्कम चोरून नेली. चोरीला गेलेल्या मालाची एकूण किंमत १२,६९० रुपये असल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी आर्णी पोलिसांनी बीएनएस कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# निम्न पैनगंगा प्रकल्पाविरोधात आंदोलन तीव्र; प्रकल्पावरील नियमभंगाचा आरोप





प्रतिनिधी २४ मार्च

**यवतमाळ :** खडका (ता. आर्णी) येथील निम्न पैनगंगा सिंचन प्रकल्पाविरोधात राष्ट्रीय किसान मोर्चा व निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीने आंदोलन तीव्र केले आहे. प्रकल्पाचे काम बेकायदेशीरपणे व नियमांचे उल्लंघन करून सुरू असल्याचा आरोप करत संघटनांनी टप्प्याटप्प्याने आंदोलन छेडले आहे.

आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात १३ मार्चपासून राज्यभरातील जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये स्मरणपत्रे देण्यात आली. प्रकल्पासंदर्भातील आवश्यक कागदपत्रे व माहिती उपलब्ध करून देण्याची मागणी यावेळी करण्यात आली होती. दुसऱ्या टप्प्यात २३ मार्च रोजी राज्यभर जिल्हास्तरावर मोर्चे व निषेध रॅली काढण्यात आल्या. यवतमाळ येथे आझाद मैदान ते जिल्हाधिकारी कार्यालय असा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात बुडीत क्षेत्रातील शेतकरी, शेतमजूर, आदिवासी बांधव, बौद्ध समाजातील नागरिक, युवक व महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचून आंदोलनकर्त्यांनी घोषणाबाजी करत प्रशासनाला निवेदन दिले.

संघटनांच्या म्हणण्यानुसार, प्रकल्प सुरू करण्यापूर्वी आवश्यक असलेले एसआयए अहवाल, डीपीआर मंजुरी तसेच 'एलएआरआर कायदा २०१३'नुसार भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना या प्रक्रिया पूर्ण झाल्याची माहिती प्रशासनाने दिलेली नाही. आंदोलनाचा तिसरा टप्पा म्हणून १० एप्रिल रोजी नागपूर–तुळजापूर राष्ट्रीय महामार्ग (NH-३६१) वरील आर्णी येथील दिग्रस रोड बायपास येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. त्यानंतर २३ एप्रिल रोजी महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली आहे.

प्रकल्पासंदर्भातील नियमभंगाची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, तसेच प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

या आंदोलनात राष्ट्रीय किसान मोर्चाचे भुवन मुनेश्वर, संघर्ष समितीचे मुबारक तंवर, प्रल्हाद जगताप, बंटी पाटील, प्रल्हाद गावंडे यांच्यासह हजारो प्रकल्पग्रस्त शेतकरी, शेतमजूर व युवक सहभागी झाले होते.

# अधिकारी, कर्मचाऱ्यांना डिजिटल जनगणनेचे प्रशिक्षण

प्रतिनिधी २४ मार्च



**यवतमाळ :** जिल्हा प्रशासनाच्या वतीने जनगणना प्रक्रियेत सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांना डिजिटल जनगणनेचे प्रशिक्षण देण्यासाठी तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या प्रशिक्षणाला सोमवारपासून सुरुवात झाली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आयोजित या कार्यक्रमाला निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी उपस्थित होते. प्रशिक्षणासाठी जनगणना संचालनालयाचे सहसंचालक व्ही. एस. दीक्षित यांनी मार्गदर्शन केले, तर सांख्यिकी विभागाचे मयूर पवार यांचीही उपस्थिती होती.

या प्रशिक्षणात डिजिटल घरगणनेच्या पहिल्या टप्प्यासंदर्भात सविस्तर माहिती देण्यात आली. जिल्हास्तरावरील अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी तसेच संबंधित कर्मचारी यांना या प्रक्रियेचे प्रशिक्षण देण्यात आले.

डिजिटल पद्धतीने जनगणना अधिक अचूक, पारदर्शक व वेगवान होण्यासाठी हे प्रशिक्षण महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# 'एकच शासन निर्णय, वेगवेगळ्या अंमलबजावण्या'; 'आशा'ची जिल्हा परिषदवर धडक

प्रतिनिधी २४ मार्च




**यवतमाळ :** कोरोना काळातील प्रोत्साहनपर भत्त्याच्या अंमलबजावणीत झालेल्या विसंगतींसह थकित मानधनाच्या प्रश्नावरून आशा स्वयंसेविकांनी जिल्हा परिषदेसमोर तीव्र आंदोलन छेडले. शहीद दिनाच्या पार्श्वभूमीवर काढण्यात आलेल्या या मोर्चातून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले.

शहरातील श्रमशक्ती भवन येथून निघालेला मोर्चा विविध प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत जिल्हा परिषद कार्यालयावर पोहोचला. घोषणाबाजीमुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाकडे निवेदन सादर करत तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली.

संघटनेच्या मते, कोरोना काळात प्रतिमहिना एक हजार रुपये या प्रमाणे २२ महिन्यांचा भत्ता देण्याचा शासनाचा निर्णय असतानाही, प्रत्यक्षात आशा कार्यकर्त्यांना केवळ एकदाच रक्कम देण्यात आली. त्याच निर्णयाची इतर विभागांमध्ये पूर्ण अंमलबजावणी होत असल्याचा आरोप करण्यात आला.

दरम्यान, ऑक्टोबर २०२५ पासून मानधन न मिळाल्याने तसेच विविध आरोग्य योजनांच्या मोबदल्यांमध्ये मोठा विलंब झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असंतोष आहे. नियमित उत्पन्नाचा स्रोत नसल्याने अनेकांवर आर्थिक संकट ओढवले असल्याचे सांगण्यात आले. ऑनलाईन कामांसाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध नसताना कामाची सक्ती केली जात असल्याचाही मुद्दा पुढे करण्यात आला. त्याचबरोबर नियमित व एकत्रित मानधन, किमान वेतन, सेवानिवृत्ती वयवाढ, भरपगारी रजा आदी मागण्यांकडेही लक्ष वेधण्यात आले. शासन निर्णयाबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना घेऊन तातडीने प्रश्न निकाली काढावेत, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

# अन्नछत्रालयास भोगपूजनाने प्रारंभ

प्रतिनिधी २४ मार्च



**पुसद :** श्रीराम नवमीच्या पार्श्वभूमीवर पोहरादेवी येथे जाणाऱ्या सेवालाल भक्तांसाठी पुसदमध्ये सुरू करण्यात आलेल्या सेवालाल महाराज गोर अन्नछत्रालयाचा शुभारंभ भोगपूजनाने करण्यात आला. या अन्नछत्रालयाचे उद्घाटन ना. इंद्रनील नाईक यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी बोलताना नाईक म्हणाले, "सेवालाल भक्तांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे." स्व. राज नाईक यांनी अन्नछत्राच्या माध्यमातून केलेल्या सेवाकार्याचा उल्लेख करून त्यांच्या कार्याला उजाळा देण्यात आला.

तसेच या अन्नछत्रालयाच्या माध्यमातून सेवा देणाऱ्या सेवेकरी मंडळींचेही त्यांनी अभिनंदन केले.

या उद्घाटन प्रसंगी महंत जितेंद्र महाराज, राजूदासजी जाधव, कैलास महाराज हेगडी, रामेश्वर महाराज (पिंपळगाव), दीपक आसेगावकर, उमाभाऊ पार्पीनवार, श्रीराम पवार, दयाराम चव्हाण, राजेश सोळंके, विठ्ठल खडसे, विजय जाधव, अभिजीत पानपट्टे, बाबूसिंग आडे, ऋषिकेश पंडितकर, अक्षय महाकाळ, करण ढेकळे, सुनील ढाले, मजहर खान, झहीर भाई, निखिल ठाकरे, नितीन पवार, अशोक वडते, बी. झी. राठोड, आशिष काळबांडे, क्यूम भाई, इरफान भाई, मदन भाऊ गायकवाड, सुरेश जाऊदे, डॉ. मधुकर नाईक, रणवीर पाटील यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नरेंद्र जाधव यांनी केले. प्रास्ताविक प्रा. संजय चव्हाण यांनी मांडले, तर आभार प्रदर्शन उत्तम जाधव यांनी केले.

# 'ईद मिलन' कार्यक्रमातून सामाजिक ऐक्याचा संदेश

प्रतिनिधी २४ मार्च



**शेंबाळपिंपरी :** रमजान ईदच्या पवित्र सणानिमित्त शेंबाळपिंपरी येथे 'ईद मिलन' कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सामाजिक सलोखा, एकता आणि बंधुभाव दृढ करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम जामा मस्जिद कमेटीचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र शासनाच्या विशेष शांतता राज्य पुरस्काराने सन्मानित जैनुलआबेद्दीन सिद्दीकी यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाला शेंबाळपिंपरी व परिसरातील शेतकरी, शेतमजूर, विविध धर्मीय धार्मिक स्थळांचे विश्वस्त, शैक्षणिक व विज्ञान क्षेत्रातील मान्यवर, सर्वपक्षीय कार्यकर्ते तसेच पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'ईद मिलन'च्या निमित्ताने विविध समाजघटकांतील नागरिकांना स्नेहभोजनासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी रमजान ईद हा सण एकता, प्रेम आणि बंधुभावाचा संदेश देणारा असून, राजकारणाच्या पलीकडे जाऊन सर्वांनी एकत्र येत सण साजरा करावा, असा संदेश दिला. या उपक्रमामुळे विविध धर्मीय तरुणांमध्ये संवाद वाढून सामाजिक ऐक्य व सौहार्द अधिक दृढ होण्यास मदत होईल, असे मत व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सिद्दीकी परिवार व मुस्लिम समाजाच्या वतीने उपस्थितांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी शेंबाळपिंपरी ग्रामपंचायतचे सरपंच तथा प्रशासक रविंद्र महल्ले, कृषी उत्पन्न बाजार समितीचे जेष्ठ संचालक उत्तमराव ढोले, माजी प्राचार्य विजयकुमार वाकडे तसेच सामाजिक कार्यकर्ते संघपाल कांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. परिसरातील इसापूर धरण, देवगव्हाण, हिवळणी, गौळ बुद्रुक, जगापूर, दगड धानोरा व शेंबाळपिंपरी येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. उपस्थितांनी शिरखुर्म्याचा आस्वाद घेत कार्यक्रमाचा आनंद लुटला.

कार्यक्रमाच्या शेवटी जैनुलआबेद्दीन सिद्दीकी यांनी सिद्दीकी परिवार व मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने सर्वांचे आभार मानले. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# वसंत उद्यानासाठी १९.९० कोटी मंजूर

## ना. इंद्रनील नाईक यांच्या पाठपुराव्याला यश

प्रतिनिधी २४ मार्च





**पुसद :** हरितक्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांच्या स्मृतीप्रित्यर्थ बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयालगत उभारण्यात आलेल्या वसंत उद्यानाच्या पुनर्निर्माण व सर्वांगीण विकासासाठी तब्बल १९ कोटी ९० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. ना. श्री इंद्रनील नाईक यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे महायुती सरकारकडून हा निधी मंजूर झाला आहे.

या निर्णयामुळे पुसद परिसरातील नागरिक व वसंतप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण असून महायुती सरकार व ना. नाईक यांच्याप्रती समाधान व्यक्त केले जात आहे. वसंतराव नाईक यांच्या कार्यामुळे पुसद शहराला राज्यभर सामाजिक ओळख मिळाली असून त्यांच्या स्मृती जपण्यासाठी वसंत उद्यान उभारण्यात आले होते. मात्र, तांत्रिक व प्रशासकीय अडचणींमुळे उद्यानाचा विकास व देखभाल रखडली होती. आता मंजूर निधीतून उद्यानाचा कायापालट होणार असून संग्रहालयासह विविध सुविधा उभारल्या जाणार आहेत. त्यामुळे वसंतराव नाईक यांच्या स्मृती अधिक दृढपणे जपल्या जाणार आहेत. या निधीसाठी ना. इंद्रनील नाईक यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे आभार मानले आहेत. वसंतराव नाईक यांच्या कार्याचा सन्मान राखत उद्यानाचे काम लवकर पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

> "सततच्या पाठपुराव्यामुळे वसंतराव नाईक यांच्या स्मृतीसाठी उभारलेल्या वसंत उद्यानाच्या पुनर्निर्माणासाठी भक्कम निधी मंजूर झाल्याबद्दल महायुती सरकारचे आभार," अशी प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# युद्धाच्या सावटात कृषी साहित्य महाग; शेतकऱ्यांची पुन्हा लूट

प्रतिनिधी २४ मार्च

## प्रशासनाच्या हस्तक्षेपाची मागणी

युद्धजन्य परिस्थितीचा आधार घेत उमरखेडमधील व्यापाऱ्यांकडून अवाजवी दर आकारले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. जुना साठा असूनही वाढीव दर लावले जात असल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून तपासणी करावी, तसेच साठा तपासणीबाबत स्पष्ट निर्देश जारी करावेत, अशी मागणी जोर धरत आहे.

**उमरखेड :** आंतरराष्ट्रीय घडामोडी आणि युद्धाच्या पार्श्वभूमीवर कृषी क्षेत्रावर परिणाम होण्याची चर्चा सुरू असतानाच उमरखेडमध्ये शेतकऱ्यांना लागणाऱ्या साहित्याच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. प्लास्टिकजन्य साहित्य—पोती, फवारणी साहित्य व पाईपलाईनसाठी लागणारे पाईप यांच्या किमतीत ३० ते ४० टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याचा दावा व्यापाऱ्यांकडून केला जात आहे.

मात्र, व्यापाऱ्यांकडे असलेला साठा हा जुन्या दरात खरेदी केलेला असतानाही वाढीव दराने विक्री होत असल्याचा आरोप शेतकरी व नागरिकांकडून होत आहे. संबंधित यंत्रणेकडून तपासणी किंवा कारवाई होत नसल्याने व्यापाऱ्यांना मोकळे रान मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

दरम्यान, भारत-अमेरिका कृषी कराराच्या चर्चेचा परिणाम म्हणून इतर वस्तूंचे दर वाढत असताना शेतीमालाचे दर मात्र घसरत असल्याचे चित्र आहे. व्यापाऱ्यांकडून शेतमाल कमी दरात खरेदी केला जात असल्याने शेतकऱ्यांचे दुहेरी नुकसान होत आहे. सध्या गॅस व पेट्रोल दरवाढीवर चर्चा सुरू असली तरी शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे. कोरोनासारखीच परिस्थिती निर्माण करून सामान्य नागरिक व शेतकऱ्यांची आर्थिक लूट सुरू असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

मंगळवार दि. २४ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com




# जिल्ह्यातील समाजकल्याणचे वसतीगृह बंद...
# कागदोपत्री स्व-दानासाठी
# अनुदान लाटण्याचा छंद !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम जिल्ह्यातील अनेक वसतिगृह मागील अनेक वर्षापासून बंद पडलेले आहेत. परंतु ही वसतिगृहे बंद असताना, त्या वसतिगृहात एकही विद्यार्थी राहत नसतांना 'कागदोपत्री' सुरू असल्याचे दाखवून लाखो रूपयाचे सरकारी अनुदान लाटल्या जात असल्याचा गैरप्रकार उजेडात आला आहे. या गैरप्रकारात समाज कल्याण विभागातील कर्मचारी, मध्यस्थ 'अविनाश' यांच्या झटपट श्रीमंत होण्याच्या फंड्याने संस्थाचालकही मालामाल झाल्याची चर्चा आहे.

***वाशीम जिल्ह्यात बंद वसतिगृहांना सरकारी अनुदानाची खैरात**
***समाज कल्याण विभागातील कर्मचारी, मध्यस्थ अविनाश च्या संगनमताने संस्थाचालक मालामाल**



वाशीम जिल्ह्यात अनेक वसतिगृहे आहेत. पाच वर्षापुर्वी त्या वसतिगृहात मंजूर विद्यार्थी संख्येप्रमाणे राहत होते. परंतु देशात कोरोनाची लाट आल्यानंतर जिल्ह्यातील बहुतांशी वसतिगृहे कायमस्वरूपी बंद पडली आहेत. या बंद असलेल्या वसतिगृहाच्या संस्थाचालकाला भेटून सरकारी अनुदान काढून देण्यासाठी मानोरा तालुक्यातील 'अविनाश' नावाची व्यक्ती अनुदान लाटण्याचे सर्व सोपस्कार पार पाडत असल्याची समाज कल्याण विभागाच्या परिसरात चर्चा आहे. या पापात समाज कल्याण विभागाचे काही कर्मचारी सुद्धा भागिदार असल्याने लाखो रुपयाचे सरकारी अनुदान खुलेआम लाटण्याचा गोरखधंदा सुरु असल्याचे समजते.

वाशीम जिल्ह्यातील बहुतांशी अनुदानित वसतिगृहामध्ये मंजूर विद्यार्थी संख्येपेक्षा कमी विद्यार्थी राहतात, त्या विद्यार्थ्यांनाही मूलभूत सुविधा मिळत नसल्याचे वास्तव आहे. दरवर्षी सरकारी अनुदान लाटून संस्थाचालक मालामाल होत आहेत. तर दुसरीकडे कायमस्वरूपी बंद पडलेल्या वसतिगृहांना कागदोपत्री सुरू असल्याचे दाखवून कथित संस्थाचालक, समाज कल्याण विभागातील कर्मचारी आणि दलाल संगनमताने करोडपती होण्याच्या तयारीला लागल्याची चर्चा आहे. या सर्व गैरप्रकाराची वरिष्ठांनी सखोल चौकशी केल्यास झारीतील शुक्राचार्य निदर्शनास येतील. वरिष्ठांनी या गैरप्रकारात सहभागी असलेल्या सर्व दोषींवर फौजदारी कारवाई करून आजपर्यंत हडपलेल्या सरकारी अनुदानाची रक्कम वसुल करण्याची मागणी जनतेकडून केल्या जात आहे.

# बदनामीची कहानी, १०० कोटीची मानहानी !

*** विजय वडेट्टीवार यांच्यावर मानहानीचा दावा**
*** पुढील सुनावणी २० एप्रिलला**
*** भाजप नेते राजु पाटील राजे यांची माहिती**




● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांच्याविरोधात वाशीम न्यायालयात १०० कोटींचा मानहानीचा दावा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाची पुढील सुनावणी २० एप्रिल २०२६ रोजी होणार असल्याची माहिती भाजप चे स्थानिक नेते राजू पाटील राजे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

स्थानिक विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत बोलतान भाजप नेते राजू पाटील राजे यांनी सांगितले की, २८ डिसेंबर २०२५ रोजी विजय वडेट्टीवार यांनी वाशीममध्ये मोठ्या प्रमाणात बनावट नोटा सापडल्याच्या प्रकरणावरून त्यांच्यावर गंभीर आरोप केले होते. तसेच 'माझ्यावर एफआयआर असूनही पोलीस कारवाई का होत नाही?' असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी कोणतीही शहानिशा न करता सार्वजनिक आरोप केल्याचा आरोप राजे यांनी केला. या प्रकरणी ३ जानेवारी २०२६ रोजी विजय वडेट्टीवार यांना कायदेशीर नोटीस पाठवण्यात आली होती. त्या नोटीसमध्ये आरोपांचा खुलासा करावा आणि सार्वजनिकरित्या माफी मागावी, यासाठी १५ दिवसांची मुदत देण्यात आली होती. मात्र, दिलेल्या कालावधीत वडेट्टीवार यांनी कोणताही खुलासा किंवा माफी दिली नसल्याचे राजे यांनी स्पष्ट केले. त्यामुळे १८ मार्च २०२६ रोजी वाशीम न्यायालयात मानहानीचा दावा दाखल करण्यात आला. न्यायालयाने हा दावा स्वीकारत संबंधितांना नोटीस बजावली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी २० एप्रिल रोजी होणार असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले. या घडामोडींमुळे स्थानिक राजकारणात खळबळ उडाली असून पुढील २० एप्रिल च्या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यावेळी पत्रकार परिषदेला रणजीत पाटील, मनिष चिपडे, सुरज चौधरी, राम ठेंगडे, रमेश मोहळे, नितीन शिवलकर, मोहन ढवळे, अनिल कांबळे, गजानन वाळके, बबन कनखर, योगेश लोणसुने, गजानन नवघनकर यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## थोडक्यात

### चेहेल येथील तांडा वस्तीत जगदंबा मातेची प्राणप्रतिष्ठा



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर चेहेल गावातील तांडा वस्तीत, जगदंबा माता बंजारा समाजाची कुलदेवता. अतिशय थाटामाटात जगदंबा मातेची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. जगदंबा मातेला बंजारा समाजामध्ये संरक्षणाचे प्रतीक मानले जाते, पिढ्यानपिढ्या बंजारा समाजाची काशी असलेले संत श्री संत सेवालाल महाराज पोहरादेवी. श्री संत श्री संत सेवालाल महाराज यांची प्रेरणा घेऊन. आजही हा समाज आपली लोकसंस्कृती जपत आहे. जगदंबा मातेबरोबर संत सेवालाल महाराज यांची पगडीची प्रतिष्ठा करण्यात आली.

ही प्राणपतिष्ठा लेकी बाईना बोलाऊन करण्यात आली. साळी चोळी देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला, संत सेवालाल महाराज मानवतावादी विचाराचे होते. कार्यक्रमाच्या वेळी. आरोळी सामाजिक संस्था शाखा कार्यालय चेहेल युनुस, खान कोठारीकर माजी पंचायत समिती सदस्य यांच्या हस्ते तांड्याचे कारभारी विठ्ठल राठोड यांचे शाल श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. आणि संत सेवालाल महाराज यांची प्रतिमा भेट दिली त्यावेळी उपस्थित. महंत जितेंद्र महाराज पोहरादेवी तांडा सुधार समिती महाराष्ट्र राज्य, श्री राजू राठोड नायक (सचिव) अविनाश महाविद्यालय मंगरूळपीर, ताड्यांचे नाईक विठ्ठल राठोड, माजी पंचायत समिती सदस्य युनुस खान कोठारीकर, बाबुसिग राठोड, प्रवीण चव्हाण, धर्मा राठोड, कर्मचारी देवीसिग राठोड, उपसरपंच प्रदीप पाटील चौधरी, गावचे तंटामुक्ती अध्यक्ष विनोद पाटील चौधरी आरोळी सामाजिक संस्थेचे समन्वयक दिनेश पाटील चौधरी सह उपस्थित होते. आरोळी सामाजिक संस्था चे पदाधिकारी उपस्थित होते.

# नवतेजस्विनी महोत्सव, माविमच्या भव्य प्रदर्शनाचे उद्घाटन

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

महिला आर्थिक विकास महामंडळ, वाशिम अंतर्गत आयोजित नवतेजस्विनी महोत्सव २०२६ निमित्त महिला बचत गटांच्या उत्पादनांच्या भव्य प्रदर्शनाचे उद्घाटन दि. २१ मार्च २०२६ रोजी बाबासाहेब धाबेकर सभागृह येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

खासदार संजय देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन पार पडले. कार्यक्रमास आमदार सईताई डहाके व आमदार किरणराव सरनाईक प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी कारंजा उपविभागीय अधिकारी आकाश वर्मा, उपजिल्हाधिकारी कैलास देवरे, तहसीलदार रवी महाले, जिल्हा समन्वय अधिकारी वर्षा खोब्रागडे तसेच सीएमआरसीच्या सदस्य व अध्यक्षा यांची विशेष उपस्थिती होती. या प्रदर्शनामध्ये महिला बचत गटांनी तयार केलेल्या विविध उत्पादनांचे एकूण ५५ स्टॉल्स उभारण्यात आले होते. उद्घाटन प्रसंगी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताने वातावरण देशभक्तीच्या भावनेने भारावून गेले. मान्यवरांनी




प्रदर्शनातील विविध स्टॉलना भेट देऊन महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांचे कौतुक केले तसेच वस्तू खरेदी करून त्यांना प्रोत्साहन दिले. कार्यक्रमात पंकज पाल महाराज यांच्या कीर्तनाने विशेष रंगत आणली. मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना देणारा हा उपक्रम ठरत असून, या प्रदर्शनामुळे महिलांना त्यांच्या उत्पादनांसाठी प्रभावी बाजारपेठ उपलब्ध होत आहे. भविष्यात कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन मान्यवरांनी दिले. प्रदर्शनाच्या यशस्वितेसाठी संपूर्ण जिल्हा व सीएमआरसी स्टाफ यांनी मोलाचे योगदान दिले.

विशेषतः व्यवस्थापक सीएमआरसी विजय वहाणे व त्यांच्या टीमने परिश्रम घेतले. जिल्ह्यातील विविध बचत गटांनी या प्रदर्शनात उत्साहाने सहभाग नोंदवला. महिला बचत गटांच्या वस्तूंना मोठी मागणी खासदार संजय देशमुख यांनी महिला बचत गटांच्या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा समन्वय अधिकारी वर्षा खोब्रागडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांच्या मार्गदर्शनातून आणि प्रोत्साहनातून महिला बचत गटांना निश्चितच नवी दिशा व ऊर्जा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संचालन व आभार प्रदर्शन सहायक जिल्हा समन्वय अधिकारी त्रिश्युला घ्यार यांनी केले.

# शहीद दिनानिमित्त 'मेरा युवा भारत' तर्फे विविध उपक्रमांनी देशभक्तीचा जागर

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

युवा व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार पुरस्कृत 'मेरा युवा भारत' वाशिमच्या वतीने शहीद दिनानिमित्त जिल्ह्यात विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये देशभक्तीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. जिल्हा युवा अधिकारी स्नेहल बासुतकर व लेखाधिकारी अनिल ढेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली हे उपक्रम पार पडले.

श्री बाकलीवाल हायस्कूल येथे दि. २२ मार्च २०२६ रोजी वीर शहीदांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. डी. एन. लांजेवार उपस्थित होते. अध्यक्षस्थानी एनसीसी कॅडेट्सचे शिक्षक अमोल काळे



होते. यावेळी शुभांगी काकडे, गौरी कानकटाव, आरती गंगावणे, माही अंभोरे, अनुष्का मोरे, देवयानी काळबांडे, समृद्धी शिरसाट व मयुरी शिंदे या विद्यार्थिनींनी देशभक्तीपर मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. लांजेवार यांनी युवकांनी देशप्रेम, देशसेवा व समाजसेवेची भावना जोपासावी, असे आवाहन केले. कार्यक्रमांतर्गत एनसीसी कॅडेट्सच्या विद्यार्थ्यांनी पदयात्रा काढली. या पदयात्रेदरम्यान शिवाजी महाराज चौक येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर संदेश देणारे पथनाट्य सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेजल सरनाईक हिने केले तर आभार गणेश जाधव यांनी मानले.

# झोक्यावर खेळताना गळफास लागून चिमुकलीचा मृत्यू !


● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

रिसोड शहरातील महात्मा फुले नगर परिसरात अत्यंत हृदयद्रावक घटना घडली असून झोका खेळत असताना दोरीचा गळफास लागून एका दहा वर्षीय चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना सोमवार (दि. २३ मार्च) रोजी दुपारी सुमारे १ वाजता विश्वा लॉनच्या मागील भागात घडली.

अश्विनी राजू चौधरी (वय १०) असे मृत बालिकेचे नाव असून तिच्या अकाली निधनाने चौधरी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. परिसरातही हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अश्विनी ही आपल्या घराच्या पाठीमागील अंगणात लाकडाला बांधलेल्या झोक्यावर एकटीच खेळत

**सावधगिरीचाच उपाय - पालकांनी घ्यावी काळजी**

उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे दुपारच्या वेळी अनेक नागरिक घरातच विश्रांती घेत असतात. अशा वेळी लहान मुले बाहेर एकटी खेळत असल्यास त्यांच्यावर लक्ष ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. लहान मुलांना खेळताना धोका कळत नाही. झोके, दोऱ्या, पाण्याचे टाकी, उंच जागा यांसारख्या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता अधिक असते. पालकांनी मुलांना एकटे न सोडणे खेळण्याच्या जागेची सुरक्षितता तपासणे धोकादायक वस्तूंपासून दूर ठेवणे या घटनेतून पालकांनी सतर्क राहण्याची गरज अधोरेखित झाली आहे.



होती. दुपारची वेळ असल्याने परिसरात शांतता होती. याच दरम्यान झोका खेळताना तिच्या गळ्यात दोरी अडकून गळफास लागला.

ही बाब शेजारील एका महिलेच्या लक्षात येताच तिने तत्काळ धाव घेत अश्विनीच्या आईला व इतर नागरिकांना माहिती दिली. नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत दोरी काढून अश्विनीला तातडीने रिसोड येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी तिला ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे डॉक्टरांनी तपासणी करून तिला मृत घोषित केले. अश्विनी ही महात्मा फुले नगर येथील सावित्रीबाई फुले प्राथमिक शाळेत चौथ्या वर्गात शिक्षण घेत होती. ती अत्यंत हुशार, बोलकी व सर्वांची लाडकी होती. तिच्या पश्चात आई-वडील, एक भाऊ व एक बहीण असा परिवार आहे.

शवविच्छेदनानंतर तिचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला असून संध्याकाळी तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. वृत्त लिहेपर्यंत या प्रकरणी कोणतीही तक्रार दाखल झालेली नव्हती.

# जीवनात यशस्वी होण्यासाठी वाचन आवश्यक - जिल्हाधिकारी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



*** वाशिम जिल्हा ग्रंथोत्सवाचा थाटात शुभारंभ**
*** जेष्ठ कवी इंद्रजित भालेराव यांच्या हस्ते उदघाटन**
*** ग्रंथदिंडीने शहरात वाचनाचा जागर**

वाचनाने माणूस समृद्ध होतो. प्रत्येक यशस्वी माणसाची यशोगाथा बघितल्यास वाचन हा त्यांच्या यशस्वीतेचा अविभाज्य भाग आहे हे प्रामुख्याने दिसून येते. वाचनातून विचारांच आदान प्रदान होते. तान तणावातून मुक्ती मिळण्यासाठीही वाचन गरजेचे आहे. त्यामुळेच जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर आपण प्रत्येकाने वाचनाची सवय लावली पाहिजेत, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. दि. २३ मार्च रोजी स्थानिक शासकीय जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात पार पडलेल्या ग्रंथोत्सव २०२५ च्या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून जिल्हाधिकारी कुंभेजकर हे बोलत होते.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत आयोजित या ग्रंथोत्सवाचे उद्घाटन जेष्ठ कवी इंद्रजीत भालेराव यांच्या हस्ते झाले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी अत्यंत हृदयस्पर्शी शब्दांत सांगितले, पुस्तक हे केवळ कागदांचे संकलन नसून ते विचारांचे विश्व आहे. वाचनातूनच माणसाला जीवनाची योग्य दिशा सापडते. त्यांनी पुढे वाचनाची उपयुक्तता स्पष्ट करताना नमूद केले ग्रंथोत्सवाची सुरुवात सकाळी ९ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून निघालेल्या भव्य ग्रंथदिंडीने झाली. ज्ञानाच्या मशालीने उजळलेली ही दिंडी म्हणजे वाचनसंस्कृतीचा जणू उत्सवच ठरला. ज्येष्ठ साहित्यिक धोंडूजा इंगोले आणि प्रज्ञाताई क्षिरसागर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून या दिंडीला प्रारंभ करण्यात आला. दिंडीत राणी लक्ष्मीबाई शाळेचे विद्यार्थी एनसीसी गणवेशात शिस्तबद्ध सहभाग नोंदवत होते. त्यांच्या पावलांमध्ये देशभक्तीची लय आणि हातातील पुस्तकांमध्ये ज्ञानाचा दिवा दिसत होता. प्रा. भाऊसाहेब काळे, प्रज्ञा क्षीरसागर, प्रभाकरराव घुगे, विलास अंभोरे यांच्यासह जिल्ह्यातील विविध ग्रंथालयांचे पदाधिकारी, कर्मचारी आणि ग्रंथप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक इंद्रजीत भालेराव यांनी आपल्या ओजस्वी भाषणातून सांगितले की, जगातील प्रत्येक महान व्यक्तीमागे वाचनाचा ठसा असतो, पुस्तकांशिवाय यशाची शिखरे गाठता येत नाहीत. त्यांच्या या शब्दांनी उपस्थितांमध्ये वाचनाची नवचेतना जागवली. यावेळी त्यांनी ग्रंथ माझे गुरु आणि काट्याकुट्याचा तुडवीत रस्ता, माझ्या गावाकडं चल माझ्या दोस्ता ह्या कविता सादर केल्या. कार्यक्रमाच्या पुढील सत्रात मान्यवरांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. दीपप्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाला औपचारिक प्रारंभ झाला. उपस्थित मान्यवरांचा सन्मान पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. कार्यक्रमाला आय ए एस वर्मा, तहसीलदार निलेश पळसकर, सहायक ग्रंथालय संचालक डॉ. राजेश पाटील, विभागीय ग्रंथालय संघ अध्यक्ष प्रभाकरराव घुगे, ज्येष्ठ साहित्यिक बाबारावजी मुसळे, वाशीमचे नगराध्यक्ष अनिल केंदळे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी बालाजी कातकडे, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष भाऊसाहेब काळे तसेच ग्रंथमित्र धनंजय राठोड यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी जिल्ह्यातील उत्कृष्ट वाचकांचा सन्मान करून वाचनप्रेमाला गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनिल बळी यांनी तर प्रास्ताविक बालाजी कातकडे यांनी केले. समारोप प्रसंगी प्रा. गजानन वाघ यांनी आभार मानले.

एकूणच, वाशिम जिल्हा ग्रंथोत्सव हा केवळ कार्यक्रम न राहता वाचन, विचार आणि संस्कारांचा उत्सव ठरला. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील ग्रंथालयांचे पदाधिकारी व कर्मचारी व वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चिमण्यासाठी माणुसकीचा हात
## विनोद बांगर यांच्या जलपात्र उपक्रमाने
# पुन्हा घुमणार चिवचिवाट !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●




जागतिक चिमणी दिनाचे औचित्य साधत त्यांनी रिसोड शहरासह तालुक्यातील विविध भागांमध्ये नागरिकांच्या घरांवर, गच्चीवर आणि अंगणात चिमण्यांसाठी विशेष जलपात्र व टोपल्या लावण्याचा उपक्रम सुरू केला. या उपक्रमाअंतर्गत आतापर्यंत सुमारे १०० पेक्षा जास्त जलपात्रे आणि टोपल्या बसविण्यात आल्या असून, यामुळे चिमण्यांना सुरक्षित निवारा आणि पिण्यासाठी पाणी उपलब्ध झाले आहे. रिसोड येथील पक्षप्रेमी विनोद बांगर यांनी पुढाकार घेत एक अत्यंत प्रेरणादायी आणि समाजाभिमुख उपक्रम राबवून चिमण्यांच्या संवर्धनासाठी आशेचा किरण निर्माण केला आहे.

फक्त एवढ्यावरच न थांबता, पुढील उन्हाळ्याच्या तीव्रतेचा विचार करता एप्रिल, मे आणि जून या तीन महिन्यांत आणखी ३०० जलपात्रे व टोपल्या बसविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

उन्हाळ्यातील कडक उन्हामुळे अनेक पक्षी आणि प्राणी पाण्याअभावी जीव गमावतात. ही गंभीर बाब लक्षात घेऊन हा उपक्रम अधिक व्यापक करण्याचा त्यांचा मानस आहे.

या उपक्रमामुळे समाजात पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण होत असून, अनेक नागरिकही यात उत्साहाने सहभागी होत आहेत. काहींनी आपल्या घरासमोर, तर काहींनी गच्चीवर जलपात्रे ठेवण्यास सुरुवात केली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
मंगळवार, दि. २४ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# राम रंगी रंगली राजराजेश्वर नगरी !

प्रतिनिधी २४ मार्च

**अकोला :** प्रभू श्रीराम नवमी निमित्त श्रीराज राजेश्वर नगरी अर्थात अकोला शहर राम रंगात रंगण्यास सुरुवात झाली आहे. शहरात सर्वत्र श्रीराम नवमी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम एकापेक्षा एक सुंदर बनवण्यासाठी मंडळांमध्ये चढाओढ लागली आहे. शहरातील दिवंगत आमदार गोवर्धन शर्मा प्रणित विश्व हिंदू परिषद श्रीराम नवमी शोभायात्रा समितीच्या वतीने स्थानिक सिटी कोतवाली चौकात सुरू असलेल्या रामनवमी उत्सवास राम भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



मिळत आहे. मंगळवार २४ मार्च रोजी सायंकाळी सहा वाजता सिटी कोतवाली चौकात गुजरात अंबुजाच्या सहकार्याने सुमारे २५ कोटी नरसिंह भगवान व हिरण्यकश्यप वध देखावा प्रारंभ होत आहे. तत्पूर्वी सोमवारी रात्री महाकाली ढोल पथकाने ढोल वादन करून परिसर दणाणून सोडला शोभायात्रा समितीच्या वतीने ढोल वादनाची विशेष व्यवस्था परिसरात यावेळी करण्यात आली होती. हा सुंदर कार्यक्रम पाहण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक

## ◆ महाकाल ढोल भजन संध्या वादनाने चौक भक्तिमय

त्यांनी सुद्धा आवर्जून उपस्थित होते या सुंदर कार्यक्रमाची त्यांनी प्रशंसा केली. १९ मार्च ते २६ मार्च रामनवमी पर्यंत या नऊ दिवसीय कार्यक्रमात लाखो भक्तांना लक्ष्मीनारायण मूर्तीचे वितरण, राधा कृष्णा वर आधारित गीत गायनाचा कार्यक्रम, वारकरी मंडळाचे पावली भजन, खाटू श्याम व राम बाबा यांच्या जीवनावर आधारित भजन तसेच आज मंगळवारपासून हिरण्यकश्यप वधाचा भव्य देखावा प्रारंभ होत आहे या उत्सवाचा रामभक्त महिला पुरुषांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन रामनवमी शोभायात्रा समितीचे स्थायी अध्यक्ष कृष्णा शर्मा समितीचे अध्यक्ष अरुण शर्मा, विश्व हिंदू परिषद महानगर अध्यक्ष राजीव मंजुळकर, राहुल राठी, मनीष बाचूका, नितीन जोशी, संदीप वाणी, शैलेंद्र कागलीवाल, सौ अर्चना शर्मा, पुष्पा वानखडे, सारिका देशमुख, रेखा नालट, कल्पना अडचूले, मनीषा भुसारी, मालती रणपिसे, आदी पदाधिकारी व सेवाधारी यांनी केले आहे







# विदर्भाच्या पंढरीत राम जन्मोत्सवाची जल्लोषात तयारी

### शेगाव नगरी सजली : अध्यात्म रामायण स्वाहाकारास यागाचे पूजन

प्रतिनिधी २४ मार्च

**शेगाव :** विदर्भाची पंढरी असलेल्या श्री संत गजानन महाराज मंदिर, शेगाव येथील राम जन्मोत्सव संपूर्ण राज्यात प्रसिद्ध आहे. या महोत्सवाची जय्यत तयारी सुरू असून, दैनंदिन विविध कार्यक्रम सप्ताहभर पार पडणार आहेत. आतापासून गावोगावीच्या दिंड्या, पालख्या व भाविक भक्तांचे श्रींच्या नगरीत आगमन होत असल्याने संतनगरी भाविकांच्या मांदियाळीने फुलून गेली आहे. संतनगरीही भाविकांच्या स्वागतासाठी सजली असल्याचे चित्र दिसून येत आहे.

संत नगरी शेगाव येथील श्रींच्या मंदिरात १३२ वा श्रीराम नवमी उत्सवाला गुढीपाडवा १९ मार्च गुरुवारपासून सुरुवात झाली आहे. २७ मार्चपर्यंत सप्ताहाभर श्रीराम नवमी उत्सव भक्तिमय वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने श्रींच्या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमानुसार २६ मार्च गुरुवार चैत्र शु ८ रोजी श्रीराम नवमी उत्सव पार पडत आहे.श्रीराम नवमी उत्सवा दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन श्री गजानन महाराज संस्थान कडून करण्यात आले आहे. २३ मार्च सोमवार चैत्र शु ५ रोजी श्रीराम नवमी उत्सव निमित्त ब्राह्मण वृंदांच्या मंत्रोपचारात अध्यात्म



रामायण स्वाहाकारास यागास आरंभ सकाळी ११ वाजता मंगलमय व भक्तिमय वातावरणात करण्यात आला. यागाचे पूजन वेदमूर्ती ब्राह्मण वृंदाद्वारे करण्यात आले आहे. श्रीराम नवमी उत्सव निमित्त अध्यात्म रामायण स्वाहाकारास यागास मिती चैत्र शु ५ सोमवार २३ मार्च ला आरंभ होऊन चैत्र शु ९ गुरुवार २६ मार्च श्रीराम नवमीदिनी सकाळी १० वाजता यागाची पुर्णाहुती व अवभृतस्नान होईल. श्रींच्या मंदिरात आंब्याच्या पानाची तोरणे केळीचे खांब लावून सर्वत्र मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे.

### गर्दीमुळे एकेरी मार्ग

◆उत्सवानिमित्त श्रींचे मंदिर परिसरात भाविकांची प्रचंड गर्दी होईल हे लक्षात घेता व काही अप्रिय घटना घडू नये याची दक्षता म्हणून वन-वे (एकेरी मार्ग) करण्यात आला होता. त्यात श्रींची समाधी दर्शन व्यवस्था, श्रीमुख दर्शन व्यवस्था, श्री महाप्रसाद, श्री पारायण कक्ष मंडप इत्यादी व्यवस्था करण्यात आली होती.

### भजनी दिंड्या येण्याचा ओघ सुरूच!

◆संतनगरी शेगावला राज्यभरातील विविध भागातील भजनी दिंड्या दररोज येत असून श्रींचे दर्शन व महाप्रसाद घेऊन वारकरी परतत आहेत. श्री संस्थान तर्फे भजनी दिंडी मधील वारकरी यांचा यथोचित सन्मान केला जातो व श्रींचे दर्शन घेऊन दिंडीतील वारकरी आपापल्या गावी परत जात आहेत. शेगावात भजनी दिंड्यांचे आगमन होत असल्यामुळे टाळ मृदंगाच्या गजराने व गण गण गणात बोते गुरु गजानन नमो नमः। माऊली ओ माऊली गुरु गजानन माऊली मंत्र जाप व भक्तिमय वातावरण झाले.

# अकोल्यात भक्तीचा महासागर, अलोट गर्दी

प्रतिनिधी २४ मार्च

**अकोला :** शहरातील वातावरण सध्या पूर्णपणे राममय झाले आहे. निमित्त आहे, जय श्रीराम चौक मित्र मंडळ द्वारा आयोजित करण्यात आलेली भव्य आणि नयनरम्य 'राम झाँकी'. अकोल्यातील बिर्ला गेट क्रमांक २ जवळील श्रीराम चौक येथे साकारण्यात आलेले हे देखावे सध्या शहराचे सर्वात भारी आकर्षण ठरत असून, हजारो रामभक्त दर्शन आणि दर्शनासाठी गर्दी करत आहेत. यावर्षी मंडळाने कला आणि भक्तीचा एक अद्भुत संगम घडवून आणला आहे. या झाँकीमध्ये प्रभू श्रीराम, लक्ष्मण आणि माता सीता यांच्या अत्यंत देखण्या आणि विलोभनीय मूर्तीची स्थापना करण्यात आली आहे. या मूर्तीचे रूप पाहून भक्तगण मंत्रमुग्ध होत आहेत.

या झाँकीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे येथे केवळ रामाची भक्तीच नाही, तर भगवान महादेवाची असीम 'शिव आराधना' दर्शवणारा अद्भुत देखावा आणि भगवान विठ्ठलाचे भव्य व साजिरे रूप देखील साकारण्यात आले आहे. एकाच ठिकाणी प्रभू श्रीराम, महादेव आणि विठुरायाचे दर्शन घडत असल्याने भक्तीचा एक वेगळाच आनंद भाविकांना मिळत आहे.भक्ती ऐसी कि मन मुग्ध हो जाए, दृश्य ऐसा कि आँखें भर आएँ', अशा भावना येथे येणारे भक्त व्यक्त करत आहेत. अकोला वासियांसाठी हा एक मोठा उत्सव ठरला आहे. जय श्रीराम चौक मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी घेतलेल्या अपार कष्टामुळे हे भव्य स्वरूप उभे राहिले आहे. मंडळाच्या वतीने सर्व अकोलेकर आणि रामभक्तांना विनंती करण्यात आली आहे की, त्यांनी बिर्ला गेट क्रमांक २, श्रीराम चौक येथे आजच पधारावे आणि या पावन पर्वाचा हिस्सा बनून या दिव्य नयनरम्य देखाव्यांचे दर्शन घ्यावे.

## ◆ श्रीराम चौक बिर्ला गेट येथे विलोभनीय राम झाँकी



◆श्री राम चौक बिर्ला गेट नंबर २ येथे रामनवमी उत्सवाची धूम. परिसरात जणू देवदेवता आणि संत मेळा जमलेला दिसत आहे. रामनवमीला दुपारी १२ वाजता महाआरती होईल. त्यानंतर दुपारी १२.३० ते रात्री १२ वाजेपर्यंत महाप्रसाद वितरण आणि दुपार पासून रात्री उशिरापर्यंत ११ हजार तुळशी रोपांचे वितरण करण्यात येणार आहे.





# अकोल्यात रामनवमीचा उत्साह शिगेला



प्रतिनिधी २४ मार्च

**अकोला :** विदर्भात नागपूरनंतर ज्या शोभायात्रेची सर्वाधिक चर्चा होते, त्या अकोल्याच्या भव्य रामनवमी शोभायात्रेची तयारी आता अंतिम टप्प्यात आली आहे. मान्यवरांचे हस्ते विधिवत भुमिपुजन सोहळा रंगला असून गांधी चौकात प्रभूंचा दरबार सजला असून अकोलेकर रामभक्तीत तल्लीन झाले आहेत. भक्ती, शक्ती आणि संस्कृतीचा त्रिवेणी संगम असलेल्या अकोला शहरात प्रभू रामचंद्र घराघरात आणि मनामनात विराजमान झाले आहेत. श्री रामनवमी उत्सव समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही गांधी चौक परिसरात अतिशय देखणा आणि विलोभनीय 'श्री राम दरबार' स्थापन करण्यात आला आहे. अयोध्येतील रामलल्लाच्या आगमनानंतर यंदाची रामनवमी ही अकोलेकरांसाठी विशेष पर्वणी ठरत आहे. २२ मार्चपासूनच या दरबारात विविध मंगल धार्मिक विधी, भजन, कीर्तन आणि पूजनाचे आयोजन करण्यात आले आहे. गांधी चौकातील हा परिसर आता भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाला आहे. श्री रामनवमी शोभायात्रा समितीचे श्री. भरत मिश्रा यांनी या महोत्सवाबद्दल अधिक माहिती दिली आहे.

रामनवमीपर्यंत चालणाऱ्या या अखंड सेवाकार्यात आणि विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये सर्व रामभक्तांनी सहकुटुंब सहभागी होऊन प्रभूंच्या दर्शनाचा आणि आशीर्वादाचा लाभ घ्यावा, असे कळकळीचे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. सोमवारी रात्री या राम दरबारासमोर शहीद दिनाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी शहरातील प्रमुख पोलीस अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच शहरातील किन्नर समाजातर्फे राम जीवनावर आधारित सुंदर गीत गायनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला आपल्या गोड आवाजात एकापेक्षा एक सुंदर राम गीत सादर करीत या किन्नर समाजाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

◆ गांधी चौकात सजला प्रभू श्रीरामाचा भव्य दरबार!
◆ अयोध्या नगरीचा भास, गांधी चौकात भक्तीचा महाकुंभ.
◆ अकोल्याची भव्य शोभायात्रा ठरतेय राज्याचे आकर्षण.
◆ धार्मिक उत्सवात सहभागी होण्याचे भरत मिश्रा यांचे आवाहन





# मध्यवर्ती बसस्थानक चौकात अंधाराचे साम्राज्य !

**अकोला :** शहरातील सर्वाधिक वर्दळ असलेल्या व रहदारीच्या स्थानिक मध्यवर्ती बसस्थानक चौकात रात्रीच्या वेळेस पथदिवे बंद असल्यामुळे सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरल्याचे दिसून येते. या चौकात शहरातील प्रमुख रस्त्यांवरील वाहतुकीची वर्दळ रात्री ११-१२ वाजेपर्यंत कायम असते. टॉवर चौक, अशोक वाटिका चौक आणि खुले नाट्यगृह चौकाकडून येणारी वाहतूक आणि ऑटोचालक यामुळे या चौकात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. अशातच जवळपास महिनाभरापासून या चौकातील पथदिवे बंद असल्याने चौकात अंधार पसरलेला असतो तर दुसरीकडे वाहनांच्या चकाकणारे दिवे यामुळे वाहनधारकांना वाहने काढताना त्रास होत आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेच्या कारभारावर नगरसेवक सुनील इन्नानी यांचे ताशेरे



प्रतिनिधी २४ मार्च

## ◆ अभ्यासपूर्ण भाषणाने सत्ताधाऱ्यांना फोडला घाम

**अकोला :** महापालिकेच्या सभागृहात वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक सुनील इन्नानी यांनी प्रधानमंत्री आवास योजनेतील ढिसाळ कारभारावर जोरदार हल्लाबोल करत प्रशासनाला अक्षरशः धारेवर धरले. अभ्यासपूर्वक मांडलेल्या मुद्द्यांमुळे प्रशासनाची कोंडी झाली असून, काही अधिकाऱ्याची चांगलीच गोची झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. इन्नानी यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल मिळवण्यासाठी लाभार्थ्यांना महापालिकेकडून अनाठायी दिरंगाई सहन करावी लागत आहे. ठरलेल्या मुदतीत लाभ न देऊन नागरिकांना वंचित ठेवले जात आहे, ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. 'गरजू नागरिकांना हक्काचे घर देण्याऐवजी कागदोपत्री अडथळे निर्माण करून प्रशासन स्वतःची जबाबदारी झटकत आहे,' असा घनाघात त्यांनी केला. घरकुलासाठी आकारण्यात येणारे विकास शुल्क तत्काळ माफ करावे अशी ठाम मागणी करत त्यांनी प्रशासनाच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तसेच, गुंठेवारी नियमानुसार घरकुल लाभार्थ्यांकडून घेतल्या जाणाऱ्या तपासणी शुल्कालाही विरोध दर्शवत


'गरिबांच्या डोक्यावर अतिरिक्त आर्थिक ओझे का टाकले जात आहे?' असा सवाल उपस्थित केला. यावेळी नगरसेवक सुनील इन्नानी यांनी २०१६ साली खासगी सल्लागाराला देण्यात आलेल्या दहा कोटी रुपयांचा नेमका उपयोग काय झाला हा प्रश्न प्रशासनाला कोंडीत पकडले. या प्रश्नावर सभागृहात नीरव शांतता पसरली. प्रशासन उत्तर देण्यास अपयशी ठरल्याने संशय अधिक गडद झाला. इन्नानी यांच्या आक्रमक भूमिकेमुळे महापालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, घरकुल लाभार्थ्यांना न्याय मिळणार का, हा सवाल आता अधिक तीव्र झाला आहे. तसेच गुंठेवारी बाबत जास्तीची मुदत वाढवून देण्याची त्यांनी आग्रही मागणी केली. तसेच त्याचा प्रचार व प्रसार करून गोरगरिबांना अधिक फायदा झाला पाहिजे, असे मत त्यांनी सभागृहात व्यक्त केले.

# धर्मवीर आनंदराव दिघे मंडळाचे सदस्य बनण्यासाठी जाचक अटी

प्रतिनिधी २४ मार्च

## ■ आरटीओ विभागातर्फे ऑटो चालकांची गळचेपी, ऑटो चालकांमध्ये नाराजी

**अकोला :** राज्यातील लाखो ऑटो चालक आणि त्यांच्या कुटुंबीयांना सामाजिक सुरक्षा पुरवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दिवंगत नेते आनंद दिघे यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रामुख्याने ऑटो रिक्षा आणि टॅक्सी चालक कल्याणकारी योजना सुरू केली आहे यात चालकांसाठी विमा व आर्थिक मदत, आरोग्यविषयक लाभ आणि पाल्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती चा समावेश करण्यात आला आहे या आनंद दिघे कल्याणकारी मंडळ या पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. परंतु राज्यातील ऑटो रिक्षा चालकांना या मंडळाचे सदस्य बनण्यासाठी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या एकतर्फी व व्यक्तिगत निर्णयामुळे अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. धर्मवीर आनंदराव दिघे महाराष्ट्र ऑटो रिक्षा कल्याणकारी मंडळाची सदस्यता



घेण्यासाठी आरटीओ विभागातर्फे सक्ती केली जात आहे या मंडळाचे सदस्य न झाल्यास ऑटो रिक्षांच्या परवान्यांचे नूतनीकरण केले जात नाही मंडळाचे सदस्य बनण्यासाठी ५०० रुपये प्रवेश शुल्क आणि ३०० रुपये वार्षिक शुल्क घेतले जात आहे. परिवहन विभागाच्या या जाचक अटीमुळे ऑटो चालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. एक तर आधीच पेट्रोल व गॅसची टंचाई सुरू असल्याने ऑटो चालकांना इंधन भरण्यासाठी रांगेत उभे राहावे लागत आहे. एकीकडे महागाई वाढली असताना ऑटो रिक्षाचे भाडे वाढवल्यास प्रवासी बसण्यास तयार नसल्याचे चित्र शहरात पहावयास मिळत आहे तर दुसरीकडे ई ऑटो रिक्षांची संख्या शहरात वाढल्याने पेट्रोल डिझेल व गैस वर चालणाऱ्या ऑटो चालकांची डोकेदुखी वाढली आहे. तर दुसरीकडे शहरात शेकडो बेकायदेशीर ऑटो रिक्षा धावत आहेत त्यामुळे सुद्धा परवानाधारक ऑटो रिक्षा चालकांचा व्यवसाय मोडकळीस आला आहे. शासनाने धर्मवीर आनंदराव दिघे ऑटो रिक्षा कल्याण मंडळाच्या मदतीने ऑटो चालकांसाठी कल्याणकारी योजना राबवून त्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे परंतु या कल्याणकारी मंडळाचे सदस्य बनण्यासाठी ज्या जाचक अटी परिवहन मंत्र्यांनी लादल्या आहेत त्या अटी पूर्ण करण्यासाठी आरटीओ विभागात तर्फे ऑटो चालकांना वेठीस धरल्या जात आहे. त्यामुळे भीक नको पण कुत्रे आवर अशी म्हणण्याची वेळ ऑटो चालकांवर आली आहे मंडळाचे सदस्य होण्यासाठी ज्या जाचक अटी लादल्या जात आहेत त्या अटी रद्द कराव्यात अन्यथा आरटीओ कार्यालयासमोर आंदोलन केले जाईल अशी चेतावणी ऑटो रिक्षा चालक संघटना तर्फे दिली जात आहे

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135